आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

# शेतकरी संघटक

२१ सप्टेंबर २०११ | वर्ष २८ | अंक १२

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹ १०



## पुणे कृषी आयुक्तालयावर प्रचंड मोर्चा

दि. २० सप्टेंबर रोजी पुणे येथे कृषी आयुक्तालयात प्रभारी कृषी आयुक्त पांडुरंग वाघमारे यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

सभेस संबोधित करताना मा. आ. वामनराव चटप

## करमाळा, जि. सोलापूर येथे ऊस परिषद आणि विभागवार कापूस परिषदेची घोषणा

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक १३ । ६ ऑक्टोबर २०११

मूल्य : ₹ १०

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

मुखपृष्ठ/अंक मांडणी
**श्रीकांत झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकांसंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**

**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१, फोन : ०२४०-२३४१००४. ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.


## अंतरंग


■ मुद्दा
**नीती, भीती आणि रीती**
अजित नरदे ........ ३

■ जागरण
**खाणीतील सोने**
श्रीकृष्ण उमरीकर ........ ६

■ आजकाल
**साखरेचे गुऱ्हाळ**
ज्ञानेश्वर शेलार ........ ९

■ दिशा
**शेतकरी आंदोलन : दशा आणि दिशा**
मा. रवी देवांग ........ ११

■ चर्चा
**भारतातील लोकशाहीकरण : एक समस्या**
गिरधर पाटील ........ १३

■ कॉमन नॉन सेन्स
**शेतकऱ्यांचे दुय्यम नागरिकत्व**
सुधाकर जाधव ........ १५

■ वाङ्मय शेती
**प्रक्रिया उद्योग आणि शिक्षणपद्धती**
गंगाधर मुटे ........ १८

■ (उ)संतवाणी
**फिरूनी गोळा करेन ज्ञान**
'थंडा' महाराज देगलूरकर ........ २१

■ अभिजात वाङ्मय
**गोदान**
मूळ लेखक : मुन्शी प्रेमचंद, अनु. अनंत उमरीकर ........ २२

■ **शेतकरी संघटना वृत्त** ........ २७

# सरकारला कुठली भाषा कळणार आहे?

कांद्याचं वाटोळं करून झालं. आता उसाचं वाटोळं करण्याचं सरकारने ठरवलं आहे. कापसाच्या पट्ट्यात प्रचंड प्रमाणात आत्महत्या करून आपला निषेध शेतकऱ्यांनी नोंदवला होता. रस्त्यावरची आंदोलनं किमान गेली ३० वर्षे सातत्याने चालू आहेत. कांदा प्रश्नी १३ दिवस आंदोलन करून झालं आणि आता उसासाठी शेतकरी रस्त्यावर आला आहे. आजही शासनाला ही भाषा कळत नसेल तर कुठली भाषा शेतकऱ्यांनी वापरली पाहिजे? गव्हाच्या प्रश्नाबाबत केलेला खेळखंडोबा इतका टोकाला पोहोचला, की त्यातून खलिस्तानवाद्यांचा भस्मासूर उदयाला आला. खरे तर हा प्रश्न गंभीर बनलेला असतानाही पंजाबातील शेतकऱ्यांनी तेव्हाही रस्त्यावर उतरून शांतपणे निदर्शने केली होती; पण ही भाषा शासनाला कळली नाही. पंतप्रधानांची झालेली हत्या आणि त्यानंतर अमृतसरच्या सुवर्ण मंदिरावरची लष्करी कारवाई या मार्गानेच हा प्रश्न शासनाने सोडवला.

जर साधी भाषा शासनाला कळत नसेल, तर आता काय शेतकऱ्यांनी गावागावात सत्ताधारी आमदार-खासदार-मंत्र्यांचे खून पाडायचे का? त्याशिवाय या प्रश्नाची तीव्रता शासनाला कळणारच नाही असे दिसते आहे. बहुसंख्य शेतकरी समाज हा निमूटपणे कष्ट करत आपले जीवन जगत आहे. त्याच्या या शांतपणाचा सातत्याने गैरफायदा सत्ताधाऱ्यांनी घेतला आहे. जेव्हा खुली बाजारपेठ उपलब्ध झाली. तेव्हा ती सोयीच्या क्षेत्रात फक्त खुली करण्यात आली. शेतीला मात्र खुलीकरणाचा वारा लागू दिला गेला नाही. याचा परिणाम म्हणूनच अजूनही खेड्यांची अवस्था साचलेल्या डबक्यांसारखी झालेली आहे. तो सगळा लोंढा शहराकडे आला. शहरी व्यवस्थेला हे सगळे ताण असह्य होत गेले. आता शहरांचीही व्यवस्था *पाणी नाही, वीज नाही, रस्ते भरले खड्ड्यांनी* अशी झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण करताना लोकशाही तळागाळापर्यंत पोहोचावी अशी योजना होती; पण गेल्या ६५ वर्षांत जे काही प्रयत्न झाले त्यातून स्थानिक स्वराज्य संस्था जवळपास उद्ध्वस्त झाल्या. राज्याच्या राजधानीत तसेच देशाच्या राजधानीत सगळी सत्ताकेंद्रे एकवटली. या सत्ताकेंद्रांतील लोक मुजोर बनले. सर्वसामान्यांकडे त्यांनी पूर्णतः पाठ फिरवली. सत्तेची गणितं व्यवस्थितरीत्या जुळवून वर्षानुवर्षे सत्तेच्या चाव्या स्वतःकडेच ठेवण्यात यश मिळवले. जसं वर्षानुवर्षे कॉंग्रेस सत्ता उपभोगत आहे. आता त्याच पद्धतीने इतर पक्षांनीही आपली छोटीमोठी स्थानं पक्की केली आहेत. एखाद्या छोट्या गावाची नगरपालिका वर्षानुवर्षे ठराविक माणसांच्या हातात राहते. याला काय म्हणावं? खरे तर अण्णा हजारेंच्या आंदोलनानंतर सर्वसामान्यांचा जो उद्रेक शांतपणे सामोरा आला. त्यापासून काही एक धडा घ्यायची गरज होती. कांद्यासाठी शेतकरी शांतपणे रस्त्यावर बसले आणि आता उसासाठीही याच मार्गाने ते रस्त्यावर आले आहेत; पण आजही सर्वसामान्यांची ही भाषा शासनाला समजते आहे, असे दिसत नाही.



शाळांच्या पटपडताळणीची मोठी मोहीम महाराष्ट्रात हाती घेण्यात आली आहे. मोहीम चालू असतानाच मोठ्या सुरस कथा सामोऱ्या येत आहेत. विद्यार्थी तर सोडाच औरंगाबाद जिल्ह्यात सुमारे शंभरावर शाळाच बोगस निघाल्या आहेत. या सगळ्यांमुळे सर्वसामान्यांवरचा बोजा वाढतच चालला आहे आणि त्या खाली हे नागरिक पिचून निघत आहेत. शेकडो वर्षांच्या शोषणातून शेतकरी समाज पूर्णपणे दुर्बळ झाला आहे. त्यामुळे टोकाला जाऊन आपला विरोध तो व्यक्त करू शकत नाही. फार तर सहन झालं नाही तर तो आत्महत्या करतो; पण ही बाब इतर समाजाला लागू होत नाही. जर मोठ्या प्रमाणात अन्याय करणारी परिस्थिती अशीच राहिली, भ्रष्टाचार असाच फोफावत राहिला तर ही सामान्य जनता जे काही आंदोलन हाताळेल ते शेतकरी समाजासारखे अहिंसक निश्चितच असणार नाही. आजही जेव्हा जेव्हा शहरात दंगे उसळतात तेव्हा तेव्हा मोठ्या प्रमाणात जाळपोळ, मोडतोड आणि वित्त हानी होते. या सगळ्याला हाताळण्यासाठी फार मोठ्या प्रमाणता पोलिस यंत्रणा शासनाला उभारावी लागते. तिच्यावर प्रचंड प्रमाणात खर्च करावा लागतो आणि एवढं करूनही परिस्थिती आटोक्यात येत नाही. म्हणूनच सगळ्यात कठोरपणे आपली धोरणं गैरप्रकारांच्या विरोधात राबवावी लागतील; पण दुर्दैवाने असं काही करताना शासन दिसत नाही. पंतप्रधान मनमोहन सिंग हे सगळ्यांत भ्रष्ट अशा नोकरशाही प्रवर्गातूनच आलेले आहेत. नोकरशाहीचे हे सगळे भ्रष्ट कारनामे त्यांना अतिशय व्यवस्थितरीत्या समजतात, त्यामुळे त्या संदर्भात नेमकी कारवाई काय करायची? हे त्यांना चांगल्या प्रकारे समजते; पण त्यांना स्वतःला काहीच समजून घ्यायचं नाही, असं खेदानं म्हणावं लागेल. शेतकरी समाज जो या देशाचा कणा आहे त्याच्या सहनशीलतेवर, शांतपणावर आणि कष्टाळू वृत्तीवर ही सगळी व्यवस्था तोलल्या गेली आहे. जेव्हा केव्हा त्याचा तोल ढळेल तेव्हा ही व्यवस्था कोसळायला क्षणाचाही विलंब लागणार नाही. आताच शेती सोडणाऱ्यांचे प्रमाण फार मोठे बनत चालले आहे. स्वाभाविकच शेती उत्पादनांचे पुढे काय होणार? हे सांगायची गरज नाही. मग किती जरी उपाय केले, तरी शेतीतून बाहेर पडलेला माणूस परत शेतीत जाणे शक्य नाही. मग कुठलीही पॅकेजेस कामाला येणार नाहीत. कुठल्याही योजना उपयोगी ठरणार नाहीत आणि कुठलंही अनुदान द्यायला माणसं शिल्लक राहणार नाहीत. यासाठी आज साधी गरज आहे सहानुभूतीने शेतकरी समाजाचं दुखणं समजून घेणं, त्यांच्या मागण्यांना यथोचित न्याय देणं किंवा शेतकरी चळवळ जे कित्येक वर्षांपासून म्हणते आहे, त्याप्रमाणे 'तुम्ही आमच्यासाठी काहीच करू नका, आमच्यासाठी म्हणून जे काही करता आहात ते थांबवा. आमचं काय भलं करायचं, ते आमचं आम्ही पाहून घेऊत!' ही भाषा जर सरकारला कळत नसेल तर आता कुठल्या भाषेत त्यांना सांगायचं?

# भ्रष्टाचार निर्मुलनाची तीन साधने
# नीती, भीती आणि रीती
## पण त्यांचे प्राधान्यक्रम काय?

**कडक लोकपाल झाल्यामुळे काही प्रमाणात भीती निर्माण होईल. काही भ्रष्टाचारी लोकाना शिक्षाही होईल. पण कामाच्या रीती भ्रष्टाचाराला पोषक असतील तर भ्रष्टाचार होतच राहील. लोकपालांकडे एवढी प्रकरणे दाखल होतील की लोकपाल आताच्या न्यायव्यवस्थेप्रमाणे निर्णय घेऊ शकणार नाहीत. सर्व व्यवस्थाच कुंठीत होईल.**

'लोक नीती सांगून ऐकत नाहीत. भ्रष्टाचारी लोकांना भीती हवीच. त्यासाठी कडक लोकपाल कायदा हवा. भ्रष्टाचाऱ्यांना कडक शिक्षा झाली पाहिजे. त्यांची संपत्ती जप्त झाली पाहिजे. त्यांना फाशी दिली पाहिजे.' असे काहीतरी श्री. अण्णा हजारे एका दूरदर्शन वाहिनीला सांगत होते. तेव्हा माझ्या मनात विचार आला, खरोखरच भीतीमुळे भ्रष्टाचार थांबेल काय?

लोकपाल कायद्यासाठी दिल्लीतील जंतरमंतरवर अण्णांच्या पहिल्या उपोषणाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. लोकपाल मसूदा तयार करण्यासाठी समिति नेमली गेली. या समितीत टीम अण्णांचे सदस्य घेतले. तथापि लोकपाल मसुदा तयार करण्यात सरकारला फारसा रस नव्हता. सरकारने सौम्य गुळमुळीत मसुदा तयार केला. यामुळे टीम अण्णांचे सदस्य बाहेर पडले.

पुन्हा दुसऱ्या उपोषणाची तयारी सुरु झाली. दरम्यान रामदेवबाबांच उपोषण सरकारने यशस्वी रित्या उधळले. रामदेवबाबा प्रमाणेच अण्णांनाही बदनाम करून संपवण्याचे प्रयत्न कपिल सिब्बल, मनिष तिवारी इत्यादींनी चालवलेले प्रयत्न लोकांना दिसत होते.

अण्णा आणि शांतीभूषण यांचेवर खोटे नाटे आरोप झाले. तरीही टीम अण्णांनी अतिशय मुत्सदेगीरीने आंदोलन यशस्वी केले. अण्णांना बदनाम करू पहाणारेच बदनाम झाले.सरकारला अण्णांच्या सर्व मागण्या मान्य करणे भाग पडले. आता कडक लोकपाल मसुदा तयार करण्याच्या कामाला सुरुवात होईल, असे वाटते.


अजित नरदे

लोक नीति सांगून एकेत नाहीत. त्यांना भीती असली पाहिजे, या अण्णांच्या मताशी मी सहमत आहे. पण केवळ भीतीमुळे लोक नीतिने वागतील असे मला वाटत नाही. सरकारच्या कामाच्या रीती जर भ्रष्टाचाराला उत्तेजन देणाऱ्या, आश्रय देणाऱ्या असतील तर भीती दाखवूनही भ्रष्टाचार थांबणार नाही. केवळ नीति सांगून तर प्रश्नच नाही.

श्री. अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचार विरोधी आंदोलनात खूप सातत्य आहे. माहितीच्या अधिकाराचा कायदा पास झाला. त्यामुळे अनेक सरकारी कामातील भ्रष्टाचाऱ्यांना शिक्षाही झाली आहे. काही वेळा माहिती मागणाऱ्या कार्यकर्त्यांचे खूनही झाले आहे. तरीही भ्रष्टाचाराचे एकूण प्रमाण कमी झाले, असे अण्णाही दावा करणार नाहीत.म्हणूनच तर ते लोकपाल कायद्यासाठी आग्रही आहेत.

श्री. अण्णा हजारेंच्या आधीही भ्रष्टाचार विरोधात देशात मोठे आंदोलन झाले होते. १९७४ मध्ये गुजराथमध्ये मुख्यमंत्री चिमणभाई पटेल यांच्या विरोधात तरूणांचे नवनिर्माण आंदोलन झाले होते. चिमणभाई पटेलांना राजीनामा देणे भाग पडले होते. त्यातूनच प्रेरणा घेऊन बिहारमध्ये तरूणांनी भ्रष्टाचार विरोधी आंदोलन सुरु केले. पुढे त्याचे नेतृत्व जयप्रकाश नारायण यांचेकडे गेले.

भ्रष्ट लोक प्रतिनिधींना परत बोलावण्याच्या मागणीसाठी श्री.जयप्रकाश नारायण यांनी आंदोलन सुरु केले. आंदोलनाला संपूर्ण

**[ केवळ शक्तीमान लोकपाल सर्व भ्रष्टाचार संपवेल हा गैरसमज आहे. भ्रष्टाचाराला पोषक कामाच्या रीती राहिल्या तर भ्रष्टाचाराची सुनामी येईल. त्यात शक्तीमान लोकपाल वाहून जाईल. मात्र कामाच्या रिती भ्रष्टाचाराला वाव न देणाऱ्या असतील तर मुळातच भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी होईल. अशा स्थितीत भ्रष्टाचाऱ्यांना शोधणे व शिक्षा करणे शक्य होईल. अशा वेळी लोकपाल थोडा कमी शक्तीमान असला तरी चालू शकेल. ]**

क्रांतीचे तत्वज्ञान दिले. त्यावेळीही भ्रष्टाचाराच्या विरोधात व्यापक जनमत तयार झाले होते. त्यामुळे गुजराथ आणि बिहारच्या मुख्यमंत्र्यांना राजीनामा देण्याची पाळी आली होती. हे सर्व आंदोलन मूलतः भ्रष्टाचार विरोधातच होते.महाराष्ट्रात सिमेंट कोटा प्रकरणात मुख्यमंत्री अंतुले यांना राजीनामा द्यावा लागला.

पण राजनारायण यांनी श्रीमती इंदिरा गांधीच्या खासदार निवडीच्या विरोधात अलाहबाद कोर्टात खटला दाखल केला होता. टीम अण्णांचे सदस्य शांतीभूषण राजनारायण यांचे वकील होते. याचा निकाल इंदिरा गांधीच्या विरोधात गेला. इंदिरा गांधीनी सत्तेत राहण्यासाठी आणीबाणी आणली. त्यानंतरच्या घटनांनी भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाचे मूळ स्वरूपच झाकोळले गेले. त्याला लोकशाही प्रस्थापनेची लढाई असे स्वरूप आले.

आणीबाणीचे अनुशासन पर्व सुरु झाले. विरोधकांना तुरुंगात टाकले. वृत्तपत्रावर सेन्सॉर आले. सरकारी कार्यालयात कर्मचारी वेळेवर कामावर येऊ लागले. रेल्वे वेळेत धावू लागल्या. संप, हरताळ, मोर्चे, बंद झाले. सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचाराचे प्रमाणही कमी झाले.झाले ते बरेच असे लोकांना वाटू लागले.

सगळीकडे अज्ञात दहशत पसरून होती. कुटुंब नियोजनासारखे अप्रिय कार्यक्रम समाजाची गरज म्हणून सक्तीने लादले गेले. दिल्लीतील बेकायदेशीर झोपडपट्टी हलवली गेली. या सर्वांतून असंतोष वाढत गेला. पुढे आणीबाणी उठली. निवडणूका लागल्या. तुरुंगातून बाहेर आलेले नेते नायक झाले. सत्तेवर आले.

आणीबाणी अप्रिय झालेने लोकशाही व्यवस्थेचा खुंटा हलवून घट्ट झाला. जनता पक्षाच्या बारभाई नेत्यांचा कारभार काही दिवसच चालला. सरकार आपल्याच अंर्तविरोधाने कोसळले.सर्वत्र गोंधळ माजला.लोकांना अनुशासन,कायदा सुव्यवस्था याची गरज वाटू लागली. पुन्हा इंदिरा गांधी स्थिर सरकार देण्याचे आश्वासन देऊन प्रचंड बहुमताने निवडून आल्या.

काळाचा माहिमा अगाधच म्हणावे लागेल.या सर्व गोंधळात भ्रष्टाचार विरोधी मूळ आंदोलनाचे आणि त्यातील मागण्यांचे काय झाले, हे सर्वच विसरून गेले. गुजराथमध्ये चिमणभाई पटेलांच्या राजीनाम्यासाठी तरूणांनी नवनिर्माण आंदोलन केले. तेच चिमणभाई पटेल जनता पक्षाचे मुख्यमंत्री झाले. बिहारमध्ये तरूणांनी भ्रष्टाचार विरोधी आंदोलन केले. या चळवळीत पुढे आलेले तरूण लालू प्रसाद यादव मुख्यमंत्री झाले. तेच पुढे अनेक भ्रष्टाचाराच्या प्रकरणात गाजू लागले.

भ्रष्टाचारी लोक प्रतिनिधींना परत बोलावण्यासाठी आंदोलन झाले. पण जनता पक्ष सत्तेवर आल्यानंतर हे सर्व विसरून गेले. सत्ताबदल झाला. पण भ्रष्टाचार वाढतच गेला. आज पुन्हा अण्णा हजारे लोकप्रतिनिधींना परत बोलावण्याच्या अधिकाराची मागणी करतात. लोकप्रतिनिधीला परत बोलवणे हे अराजकाला निमंत्रण देऊ शकते.

संसदीय व्यवस्थेत विरोधी पक्षाच्या दृष्टीने सत्ताधारी पक्ष नेहमीच भ्रष्ट, अकार्यक्षम, नालायक असतो. तेव्हा त्यांना परत बोलावण्यासाठी सारखी मागणी होऊन संसदीय व्यवस्थाच धोक्यात येण्याची शक्यता आहे. म्हणूनच जनता पक्षाच्या नेत्यांनी सत्तेवर आल्यावर याकडे दुर्लक्ष केले. श्री. अण्णा हजारे ही बाब लक्षात घेतील तर बरे होईल.

जयप्रकाश नारायण यांच्या भ्रष्टाचार विरोधी चळवळीत मीही सहभागी झालो होतो. १९७४-७५ साली सोने, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि कपड्याची मोठी तस्करी होत असे. मुंबईतील एका हॉलमध्ये आम्हा तरूणांना तस्करीचा माल घेणार नाही, वापरणार नाही, अशी शपथ जयप्रकाश नारायण यांनी दिली. त्यामुळे मी कटाक्षाने तस्करीचा माल टाळू लागलो. मी रेडिओ टेप (टू इन वन) घेतला नाही. त्या वेळी आयात लोकप्रिय कापड स्ट्रेचलॉन घातला नाही. जयप्रकाश  नारायण यांनी आम्हाला प्रथम नीति सांगितली. त्यांचे आम्ही कसोशीने पालन केले. तरीही तस्करी थांबली नाही.

पण आश्चर्य असे की पुढे कोणीही नीति न सांगता, भीतीही न दाखवता तस्करी थांबली. १९९० नंतर आर्थिक उदारीकरण सुरु झाले. सोन्यावरील, इलेक्ट्रॉनिक वस्तूंवरील, कपड्यावरील, आयात कर कमी झाले. सर्व तस्करी बंद झाली. रितसर कर भरून सर्व माल भारतात उपलब्ध होऊ  लागला. सर्व तस्कर बेकार झाले. हे तस्करच पुढे प्रॉपर्टी आणि खंडणीच्या उद्योगात लागले. कारण तेथे अद्याप उदारीकरण पोहोचले नव्हते. आणि आजही नाही.त्यामुळे हा खंडणीचा व्यवसाय अद्याप सुरू आहे.

१९९० पूर्व काळात समाजवादी विचारांच्या प्रभावामुळे लायसन्स, परमिट आणि कोटा व्यवस्थेमुळे भ्रष्टाचार माजला. आर्थिक विकास कुंठीत झाला. वस्तूंची टंचाई निमार्ण झाली. फोन, स्कूटर, गाड्या, सिमेंट घेण्यासाठी वर्षानुवर्षे नंबर लागू लागले.

हे सर्व १९९० नंतरच्या काळात झालेल्या उदारीकरणानंतर बदलले. उद्योग क्षेत्र खुले झाले. आयातकर कमी झाले. विदेशी भांडवल येऊ लागले. विकासाची गती वाढली. नवा समृध्द, स्वकर्तृत्वाने पुढे आलेला मध्यमवर्ग तयार झाला. पण याच वेळी इतर अनेक क्षेत्रात (खास करून) सरकारी क्षेत्रात उदारीकरण झाले नाही. यामुळे तेथील भ्रष्टाचार सुरुच राहिला. पण एकूण समृध्दीचे प्रमाण मात्र वाढत गेल्याने भ्रष्टाचाराची व्याप्तीही वाढत गेली.

अण्णा हजारे म्हणतात तसे केवळ भीतीने भ्रष्टाचार कमी होणार नाही. देशात तस्करीच्या विरोधात खूप कडक कायदे होते. तरीही अवास्तव आयात कर लावल्याने तस्करीत प्रचंड नफा मिळू लागला.



त्यातून कस्टम आणि पोलिस खाते विकत घेऊन खुले आम तस्करी सुरु राहिली.पण आयात कर कमी करताच अवास्तव नफा कमी झाला. तस्करी थांबली. आपल्या कामाची रीत भ्रष्टाचाराला उत्तेजन देणारी असेल तर भ्रष्टाचार कमी होणार नाही. कितीही नीति सांगितली आणि भीतीही दाखवली तरीही भ्रष्टाचार होतच राहील.

अण्णा हजारे गांधीवादी असले तरी ते लष्करातून आले आहेत. त्यांचा दंडुक्यावर विश्वास आहे. त्यांनी बळजबरीनेच राळेगण सिद्धी मध्ये दारूबंदी केली.

त्यामुळे अण्णा हजारे यांनी भीतीला प्राधान्य देणे स्वाभाविक आहे.

मात्र गांधी हयात असते तर त्यांनी प्रथम नीति, नंतर रीती आणि भीती असा प्राधान्यक्रम दिला असता.

मात्र माझा प्राधान्यक्रम प्रथम रीती, नंतर भीती, मग नीति असा असेल.

भ्रष्टाचाराला वाव न देणाऱ्या कामाच्या रीती शोधाव्या लागतील. यासाठी अधिक उदारीकरणाच्या दिशेने जावे लागेल. अर्थक्षेत्रातील सरकारी हस्तक्षेप कमी करावा लागेल.अनेक सरकारी सेवांचे खाजगीकरण करावे लागेल. भ्रष्ट, अकार्यक्षम सरकारी सेवकांचे संरक्षण काढून घ्यावे लागेल.सरकारी नोकरीला लागला की निवृत्त होईपर्यंत कोणीही काढून टाकू शकत नाही.फार तर बदली करतील. यामुळे सर्व सरकारी नोकर, शिक्षक, प्राध्यापक बेजबाबदार झाले आहेत.

कडक लोकपाल झाल्यामुळे काही प्रमाणात भीती निर्माण होईल. काही भ्रष्टाचारी लोकाना शिक्षाही होईल. पण कामाच्या रीती भ्रष्टाचाराला पोषक असतील तर भ्रष्टाचार होतच राहील. लोकपालांकडे एवढी प्रकरणे दाखल होतील की लोकपाल आताच्या न्यायव्यवस्थेप्रमाणे निर्णय घेऊ शकणार नाहीत. सर्व व्यवस्थाच कुंठीत होईल.

भ्रष्टाचाराला कमीतकमी वाव देणाऱ्या कामाच्या रीती आणल्या तर मूळातच भ्रष्टाचाराची प्रकरणे कमी होतील. त्यातून भ्रष्टाचार झालाच तर लोकपालाकडून शिक्षा देणे शक्य होईल. अशा स्थितीत नीतिचे वागणे सर्वांना सोयीचे आणि फायद्याचे वाटू लागेल.

म्हणूनच माझा प्राधान्यक्रम रीती, भीती आणि नीति असा आहे.

**अजित नरदे**
१८ अ, श्रध्दा संकुल, दुसरा मजला,
६ वी गल्ली, जयसिंगपूर ४१६१०१, जि. कोल्हापूर
फोन : (०२३२२) २२५३४८, २२६३४८,
मोबाईल : ९८२२४५३३१०
anekant.prakashan@gmail.com

■■


# खाणीतील सोने



उत्तर कानडा म्हणजे गोव्याच्या दक्षिणेकडचा कर्नाटकाचा विभाग. त्यातला एक मुख्य जिल्हा आहे कारवार. कारवार तेथील अणु प्रकल्प, नौदलाचा तळ आणि आपार निसर्गसौंदर्य यांसाठी प्रसिद्ध आहे. त्याचसोबत कारवार तेथील बंदरासाठीही प्रसिद्ध आहे आणि त्याच कारणाने कुप्रसिद्ध होत आहे.

मी स्वतः कारवारला गेलो असताना असे पाहिले की बंदराकडे जाणाऱ्या रस्त्याची एक बाजू पूर्णपणे लाल आहे, बंदराकडे जाणारे ट्रक लाल धुळीने माखलेले इतकेच काय त्यांची चाकेही लालच. पुढे चौकशी केल्यावर असे कळले की कारवारच्या बंदरातून लोह खनिजाची वाहतूक मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे रस्त्यावरचे ट्रक खनिज वाहून नेणारेच असतात. त्यावेळेस कर्नाटकच्या खाण उद्योगाची 'किर्ती' कानावर आलेली नव्हती म्हणून सदर अनुभव विस्मरणात पडला. पुढे कर्नाटकचे लोकायुक्त संतोष हेगडे यांच्या अहवालाबद्दल वाचले आणि जुनी आठवण जागी झाली. हा खाण घोटाळा किती मोठा आहे याचा अंदाज आला.

कर्नाटकमधील या खाण घोटाळ्याचे खापर जरी रेड्डी बंधूंवर फोडण्यात येत असले तरी त्यासाठी सरकारचे खाणविषयक धोरण कारणीभूत आहे हे नक्की. आपल्या देशात खाणीतून खनिज काढण्याचा परवाना केंद्र सरकार देते. त्यासाठी म्हणे राज्यसरकारची शिफारस लक्षात घेतली जाते म्हणे. हा परवाना कोणाला द्यायचा हे केवळ सरकारच्या मर्जीवर अवलंबून आहे आणि लाच देऊन सरकारची मर्जी कशी संपादन करता येते हे एक उघड गुपीत आहे. म्हणजे परवाना देणाऱ्या खात्याला पैसे खाऊ घातले की काम झालेच. बरे गंमत बघा ज्या खनिजाची किंमत २००७-०८ मध्ये रु. ६,००० प्रतिटन होती त्यासाठी सरकारला केवळ रु. २७ एवढी रॉयल्टी द्यावी लागत होती. खरे तर राष्ट्रीय संपत्तीचा व्यापार जेव्हा मांडला जातो तेव्हा त्यात पारदर्शकता असायलाच हवी. त्याच बरोबर देशाचा जास्तीत जास्त कसा फायदा होईल हे पाहणे; पण गरजेचे आहे. जे २जी घोटाळ्यात झाले तेच खाणींच्याबाबत होत आहे. सरकारची संपत्ती वाटेल त्याला वाटेल त्या भावाने विकण्याचे अधिकार सरकारला आहेत आणि त्यामुळेच घोटाळे जन्माला येतात. खरे तर सरकारी संपत्तीचा जाहीर लीलाव व्हायला हवा. सरकारच्या अटींच्या आधीन राहून जो सर्वांत जास्त किंमत देईल त्यालाच खाणकामाचा परवाना दिला गेला पाहिजे. सरकारच्या पर्यावरण-पुनर्वसन-रॉयल्टी इत्यादींविषयक अटींचे पालन परवानाधारक करतो का नाही याकडे सरकारचे लक्ष असणे गरजेचे आहे. जाहीर लीलाव केल्यामुळे खनिजासाठी बोली लावणाया कंपन्या खनिज साठ्याचा, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय भावाचा, खनिज उकरण्याच्या खर्चाचा अंदाज घेऊन आपली बोली लावते. बोली खुली असल्यामुळे जी कंपनी सरकारला सर्वांत जास्त उत्पन्न देईल तिलाच परवाना दिला जातो आणि सरकारचा फायदा होतो; पण सध्याच्या परवाना देण्याच्या पद्धतीमध्ये सगळे काही सरकारच्या 'मर्जी'प्रमाणे चालते आणि म्हणूनच रु. ६००० किमतीच्या खनिजाला केवळ रु. २७ ची रॉयल्टी आकारल्या जाते. ही रॉयल्टी वाढवण्याचा प्रयत्न प्रणव मुखर्जी यांनी केला; पण रेड्डींसारख्या खाण माफियांच्या दबावाखाली त्यांना तसे करत आले नाही. एवढा जोर आहे या खाण माफियांचा. आपले राजकीय-आर्थिक वजन वापरून खाणकामाची परवानगी घ्यायची. मग दिलेल्या मर्यादेच्या कित्येक पटीत खनिज उकरून



श्रीकृष्ण उमरीकर

३० सप्टेंबर रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने नव्या 'मायनिंग बिलाला' मंजुरी दिली. जुना कायदा रद्द करून हा नवा कायदा अमलात आणण्याचे केंद्राने ठरविले आहे. नव्या कायद्याद्वारे राज्य सरकारला खाणींसाठी निविदा काढण्याचे अधिकार देण्यात येत आहेत. निविदांची प्रक्रिया कशी असावी याविषयी काही माहिती उपलब्ध न झाल्यामुळे खाण व्यवसायातला अंधार संपणार का नाही ते कळण्यास मार्ग नाही.

त्याचसोबत सरकारने करांत वाढ सुचविली आहे ज्यामुळे कोळसा महागणार. त्याचा परिणाम इतर बऱ्याच वस्तुंच्या किमती वाढण्यामधे होणार हे स्पष्ट आहे.

सरकारने एक अजून 'सरकारी' बदल सुचविला आहे. तो म्हणजे खाण कंपनीच्या नफ्यातला २६% हिस्सा प्रकल्पग्रस्तांच्या मदतीसाठी वापरल्या जावा. हा उपाय सरकारी यासाठी, कारण त्यामुळे भ्रष्टाचाराला वाव मिळणार आहे. म्हणजे ज्या कंपनीने जास्त कार्यक्षमतेने आपला कारभार चालवला तिचा नफा जास्त आणि म्हणून तीला सरकारला जास्त वाटा द्यावा लागणार. त्यामुळे काही कंपन्या नफा लपविण्याचा प्रयत्न करणार त्यामुळे लेखापरीक्षण करणाऱ्या यंत्रणेला 'पैसे खाण्याची' संधी मिळू शकते. तसेच हा पैसा सरकारकडे जमा झाल्यावर त्याचा वापर प्रकल्पग्रस्तांच्या मदतीसाठी करण्यासाठी पुन्हा सरकारी यंत्रणाच काम करणार असली तर त्यांना भ्रष्टाचारासाठी नवे कुरण उपलब्ध करून दिल्यासारखेच आहे.

एकूणच काय हा कायदा खाण व्यवसायात अमुलाग्र बदल करणारा नसून भ्रष्टाचाराची नवी कुरणे निर्माण करणारा आहे असे म्हणावे लागते. अण्णा हजारेंच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनातून सरकारला काही अक्कल आली नाही हे स्पष्ट आहे. एवढेच नाही तर पंतप्रधान जरी सरकारचे प्रमुख असले तरी सरकारवर भ्रष्टाचाऱ्यांची मजबूत पकड आहे हे सूर्यप्रकाशाएवढे स्पष्ट आहे!

काढायचे आणि त्यावर सगळेच कर चुकवून परदेशी पाठवायचे अशी यांच्या कामाची पद्धत.

हे अवैध काम करताना सरकारी अधिकाऱ्यांना पैसे चारून शांत बसवण्यात येते. पुढे रेड्डींचा जोर जसजसा वाढत गेला तसतसे त्याचे राज्य बेल्लारीमध्ये मजबूत होत गेले. शेवटी तर रेड्डीने सरकारी अधिकाऱ्यांच्या वतीने स्वतःच पैसे वसूल करायला सुरुवात केली. त्याला नाव दिले 'बेल्लारी प्रोटेक्शन मनी!' या रेड्डीच्यावतीने त्याची पिलावळ वेगवेगळ्या खाण मालकांकडून हप्ते गोळा करत होते. त्याच्या लेखी नोंदीही ठेवत होते. त्यांच्या निर्ढावलेपणाची हद्द तर पाहा, त्यांनी हे पैसे चेकच्या माध्यमांतून वसूल करून बँकेत जमा केले! त्यातच चीनने मोठ्या प्रमाणात लोह खनिज आयात करायला सुरुवात केली, कारण त्यांच्याकडे बांधकामे वाढतच चालली होती त्यासाठी देशातले लोखंड पुरत नव्हते! त्यामुळे रेड्डी बंधूंचा 'उद्योग' वाढतच चालला होता आणि त्यांना कशाचीच भीती वाटत नव्हती. हेच पाहाना बेल्लारीमध्ये चौकशी करण्यासाठी गेलेल्या कर्नाटक लोकायुक्त कार्यालयाच्या अधिकाऱ्याला रेड्डीच्या माणसाने उद्दामपणे विचारले की बेल्लारीमध्ये यायची परवानगी रेड्डींकडून घेतलीस का? जेव्हा २०१० मध्ये येडीयुराप्पांनी खनिजावर लेव्ही लावायचा प्रयत्न केला तेव्हा या रेड्डीने भाजपचे आमदार विकत घेऊन सरकारच पाडायचा प्रयत्न केला! एवढा त्याचा जोर, एवढी त्याची शक्ती.

इतकेच नाही तर या रेड्डीने कर्नाटकची हद्द ओलांडून शेजारच्या आंध्रात खाणकाम सुरू केले. त्याविषयी जेव्हा आंध्र सरकारने (वायएसआर रेड्डींच्या मृत्युनंतर) तक्रार केली, तेव्हा रेड्डीने मोजणीपण होऊ दिली नाही. वन विभागाच्या हद्दीत त्याने घुसखोरी केल्याची तक्रार जेव्हा समोर आली तेव्हा तुम्ही त्याच्या विरुध्द कारवाई करणार का? असे विचारणाऱ्या ईमेलला तेव्हाचे पर्यावरण मंत्री जयराम रमेश यांनी उत्तरच दिले नाही.

सरकारचे खाण खाते काय झोपले होते का? असा प्रश्न पडणे साहजिक आहे. या खात्याने आपले नेहमीचेच रडगाणे सुरू केले आहे. आमच्याकडे मनुष्यबळ कमी आहे वगैरे... एका प्रकरणात रेड्डींची चौकशी सुरू केली असता त्याने न्यायालयातून स्थगितीचा आदेश आणला. मग काय त्याचे 'खाण काम' जोरात सुरू राहिले आणि सरकारी अधिकाऱ्यांना मात्र खाणचे निरीक्षण-तपासणी करण्यास बंदी!

रेड्डींच्या शक्तीचे उगमस्थान त्याचा पैसा आहे. कर्नाटकचे लोकायुक्त संतोष हेगडे यांनी सादर केलेल्या अहवालाप्रमाणे २००६-२०१० च्या दरम्यान जवळपास ३,००,००,००० टन (३ कोटी टन) एवढे खनिज अवैधरीत्या निर्यात केले. एकूणच हा घोटाळा १६,००० कोटींपेक्षा जास्त मोठा असावा असा अंदाज आहे.


सध्या तुरुंगात असलेले रेड्डी बंधू एका पोलिस हवालदाराची मुले आहेत. १९९९ साली भाजपच्या सुषमा स्वराज यांनी बेल्लारीमधून सोनिया गांधींविरुध्द निवडणूक लढली होती तेव्हा सुषमाजींना यांनी 'मदत' केली होती. तेव्हापासुन त्यांचे राजकीय वजन वाढतच गेले. ते एवढे की होता होता त्या खाली येडीयुराप्पांना दबावे लागले!

२-३ वर्षांपूर्वी कर्नाटक लोकायुक्त संतोष हेगडे यांनी खाण घोटाळा उजेडात आणला आणि सरकारकडे अधिकारी-राजकारणी यांची चौकशी करण्याची परवानगी मागितली. सरकारने त्यांना केवळ अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची परवानगी दिली. म्हणून हेगडे नाराज झाले आणि त्यांनी लोकायुक्त पदाचा राजीनामा दिला. मग त्यांना स्वतः अडवाणींनी तो मागे घ्यायला लावला. शेवटी दोन महिन्यांपूर्वी त्यांनी आपला हजारो पानांचा अहवाल सादर केला. ज्यात त्यांनी भ्रष्ट राजकारणी-सरकारी अधिकारी-खाण माफिया यांनी संगनमताने कसा भ्रष्टाचार केला आहे याचा सविस्तर खुलासा केला आहे. आता वाट आहे सरकार दोषींवर किती तत्परतेने आणि कोणती कारवाई करते याची. त्याचसोबत दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे खाणीच्या लीलावासाठी सरकारने जास्त पारदर्शक पद्धत राबवायला पाहिजे ज्यामुळे सरकारचा जास्तीत जास्त फायदा होईल. सगळीकडून घोटाळ्यात फसणारे सरकार हे करेल का? हा मोठा प्रश्न आहे. मनमोहन सिंग यांची हतबलता आणि त्यांची 'सूत्रे' हलवणाऱ्यांचा भ्रष्ट इतिहास पाहता परिस्थितीमध्ये काही मोठे बदल होतील ही आशा वेडी ठरेल.

**श्रीकृष्ण उमरीकर**
नानलपेठ, परभणी-४३१४०१
मोबाईल : ९४२२६४६२८३
umrikar@gmail.com

■■

# केंद्रीय मंत्रिमंडळाचे सुधारलेले आरोग्य



**मंत्र्यांचे-आमदार खासदारांची आयकर विवरण पत्रे जाहीर करण्यात यावीत म्हणजे खरी पारदर्शकता येईल. याची सुरुवात केंद्रातल्या मंत्र्यांपासून करायला पाहिजे. कारण त्यांनी जनतेची सेवा करतानाच ही संपत्ती जमवली आहे आणि त्यांनी केवळ आपली संपत्ती किती हे न सांगता ती कशी मिळवली हेही जाहीर करावे.**

देशाची सरकारी हवाई वाहतूक कंपनी प्रचंड तोट्यात आहे; पण ती चालवणाऱ्या हवाई खात्याच्या मंत्र्यांचा 'धंदा' मात्र जोरात चालू असला पाहिजे. प्रफुल्ल पटेलांनी (ते आता हवाई वाहतूक मंत्री नाहीत. त्यांची 'कामगिरी' पाहून त्यांना बढती देऊन अवजड उद्योगाचे कॅबिनेट मंत्री बनविण्यात आले आहे!) गेल्या २८ महिन्यांत रु. ४३ कोटी कमावले आहेत. त्यांची संपत्ती जी ७९ कोटी होती ती वाढून आता १२२ कोटी झाली आहे. म्हणजे रोज जवळपास ५ लाख रुपये! एअर इंडियाच्या ४०% कर्मचाऱ्यांचा वर्षाचा पगारही त्या पेक्षा कमी आहे!

केंद्र सरकारच्या मंत्र्यांच्या संपत्तीचे हे विश्लेषण 'असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स' आणि 'नॅशनल इलेक्शन वॉच' या संस्थांनी केले आहे. त्यावरून असे दिसते की, केंद्रातल्या मंत्र्यांनी गेल्या २८ महिन्यांत आपल्या संपत्तीत रु. ३.६ कोटींची भर घातली आहे.

द्रविड मुन्नेत्र कळघमच्या जगतरक्षकन यांची संपत्ती २००९ मध्ये केवळ रु. ५.९ कोटी होती ती वाढून आता ७० कोटी झाली आहे. (बरोबर आहे म्हणा त्यांच्या अनेक शिक्षण संस्था आहेत!)

आपल्या मिलिंद देवरांचेही बरे चालले आहे असे दिसते. २००९ मध्ये त्यांच्याकडे केवळ १७ कोटी रुपये होते. आता ३३ कोटी आहेत. २००४ मध्ये त्यांच्या कडे ८.८ कोटी रुपये होते असे त्यांनीच आपल्या निवडणूक प्रतिज्ञापत्रात कबूल केले होते. सात वर्षांत त्यांची संपत्ती चारपट वाढली आहे. त्यावरून त्यांचे बरेच चालले आहे असे म्हणावे लागेल. जवळपास ते रोज रु. १ लाख कमवतात!

पवार साहेबांनी मात्र आपल्या संपत्तीत केवळ ४ कोटी रुपयांची भर घातली आहे. त्यांच्या उद्योगांची माहिती असणाऱ्या जाणकारांना अशी शंका येते आहे की त्यांनी आपली एकूण संपत्ती जाहीर करण्याऐवजी मासिक संपत्ती तर जाहीर केली नाही ना!

आंध्रातल्या जगन मोहन रेड्डींनी याच काळात आपल्या संपतीत रु. २८० कोटींची भर घातली आहे!

हे प्रकरण गंभीर आहे. महाराष्ट्रातील करोडपती आमदारांची संख्या जी २००४ मध्ये १०४ होती ती वाढून १८६ झाली आहे. केंद्रातील ३/४ पेक्षा जास्त मंत्री करोडपती आहेत आणि त्यांनी ही संपत्ती मंत्री असताना जमा केली आहे.

या मंत्र्यांचे-आमदार खासदारांची आयकर विवरण पत्रे जाहीर करण्यात यावीत म्हणजे खरी पारदर्शकता येईल. याची सुरुवात केंद्रातल्या मंत्र्यांपासून करायला पाहिजे. कारण त्यांनी जनतेची सेवा करतानाच ही संपत्ती जमवली आहे आणि त्यांनी केवळ आपली संपत्ती किती हे न सांगता ती कशी मिळवली हेही जाहीर करावे.

याच मंत्र्यांनी रोज ३० पेक्षा जास्त रुपये खर्च करणाऱ्याला दारिद्र रेषेच्या बाहेर समजावे असे सुचविले आहे. गरिबांची परिस्थिती या करोडपतींना कळणार कशी? याचा विचार व्हायलाच हवा. कारण गेल्या काही वर्षांत अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की केवळ करोडपतीच निवडणूक लढू शकतात. गरीब नाही. जिंकायची तर बातच दूर!

*('द हिंदू' या इंग्रजी दैनिकात दि. २१ सप्टेंबर २०११ रोजी प्रकाशित झालेल्या लेखाचा श्रीकृष्ण उमरीकर यांनी केलेला स्वैर अनुवाद)*

# साखरेचे गुऱ्हाळ

**सद्य:स्थिती**


'जास्त उत्पादन घ्या आणि अधिक नफा कमवा' अशी सर्व धंद्यांची लाईन असली तरी शेतकऱ्यांना मात्र कधीच लागू पडत नाही. जास्त पिकवा आणि जास्त तोटा सहन करा, अशी त्यांची अवस्था नेहमीसाठी झाली आहे. जेव्हा त्यांच्याकडे विकायला काही नसते, उत्पादन कमी झालेले असते, तेव्हा शेतीमालाचे भाव कडाडतात. त्यावर मोठा गहजब होतो आणि कृत्रिमरीत्या सरकारी हस्तक्षेप करून भाव पाडले जातात. अधिक उत्पादन घ्या, असे पुढाऱ्यांचे ऐकून अधिक उत्पादन घेतले तर जेवढे उत्पादन जास्त तेवढा तोटा अधिक होतो. नुकतेच उत्तर महाराष्ट्रात कांद्याचे आंदोलन संपले. कांद्याचा प्रश्नच जणू आता कायमसाठी निकालात निघाला आहे, असे सर्वांनाच चार-दोन दिवसांनीच वाटू लागले आहे. खरे तर पुन्हा ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये अशीच अवस्था तयार होणार आहे. कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे शहाणपण कोणीच दाखवत नाही आणि हे शहाणपण न दाखवण्यातच राजकारणी शहाणपणा आहे, त्यामुळे पुन्हा हा प्रश्न पुढच्या वर्षी पेटणार आहे. कांद्याचे आंदोलन संपते न संपते तोच पश्चिम महाराष्ट्रात साखर पट्ट्यांमध्ये गेल्या एक महिन्यापासून ऊस आंदोलन सुरू झाले आहे. या वर्षी उसाची मुबलक उपलब्धता असल्याने साखरेचे विक्रमी उत्पादन होणार आहे. दसरा चार दिवसांवर येऊन ठेपला असताना सर्व साखर कारखान्यांची बॉयलर पेटवण्याची तयारी झालेली असताना ऊस आंदोलनही पेटले आहे. साखर कारखान्यांचा बॉयलर आणि उसाचे आंदोलन एकाच वेळी पेटण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. वर्षानुवर्षे हेच चालू आहे. दरवर्षी शेतकऱ्यांना रस्त्यावर उतरावे लागत आहे. उसाचा प्रश्न मार्गी लागतो न लागतो तोच, कापसाचा प्रश्न उभा आहे. शेतकऱ्यांना उसंत अशी अजिबात नाही.

**अनागोंदीचे मूळ**

देशात सध्या ५७ लाख मेट्रीक टन साखर शिल्लक आहे. त्यातील ३४ लाख टन महाराष्ट्राचा शिलकी साठा आहे. शेतकऱ्यांनी मागील गळित हंगाम संपल्यापासूनच साखरेवर निर्यातबंदी लावू नये, साखरेला आणि साखर कारखान्यांना मुक्त व्यापाराची परवानगी द्यावी, अशी मागणी केली आहे; पण सरकार मात्र आयात-निर्यातीची तोटी आपल्या हातातून सोडायला तयार नाही. १५ लाख मेट्रीक टनांच्या निर्यातीची मागणी केलेली असताना ती एकदम न देता सध्या फक्त पाच लाख टन साखरेच्या निर्यातीला परवानगी दिलेली आहे. या परवानगीने कोटा परमिट सरकारच्याच हातात आहे. स्थानिक बाजारपेठेत विक्रीसाठी सरकार महिन्यामहिन्याला कोटा जाहीर करते. साखरेचे भाव पडण्याला आणि पर्यायाने उसाची आधारभूत किंमतही शेतकऱ्यांना न मिळण्याला हे सरकारचे धोरण वर्षानुवर्षे कारणीभूत ठरत आहेत. केंद्र सरकारने १५ लाख मेट्रीक टन निर्यातीला दिलेल्या परवानगी पैकी पाच लाख टन वाटा राज्याला मिळाला आहे. सध्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत साखरेचे भाव फारसे समाधानकारक नसल्याने निर्यात फायदेशीर ठरत नाही. निर्यातीचा हा निर्णय आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत काय भाव आहे व त्याचा आपल्याला कितपत फायदा होईल, यावर न ठरता महिनोनमहिने केंद्राच्या निर्यात धोरणाच्या अंतर्गत मंत्रीगटाच्या बैठकांवर बैठका घेऊन घेतल्या जाते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत होणाऱ्या चढउताराचा काहीही विचार केला जात नाही. जेव्हा निर्यातीला परवागनी दिलेली असते, तेव्हा नेमके आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील भाव कोसळलेले असतात. शेतकऱ्यांनी मोठा आटापिटा करून निर्यातबंदी उठवण्यास सरकारला भाग पाडले तरी त्यात झालेला उशीर हा शेतकऱ्यांच्या तोट्याचे कारण ठरतो. हे निर्णय व्यावसायिक किंवा व्यवहारिक उद्देशाने आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचा फायदा घेण्याच्या उद्देशाने कधीच होत नाहीत. आपल्याला नेहमीच आतबट्ट्याचा धंदा करून तोटा सहन करावा लागतो. पर्यायाने साखर कारखान्यांचा अनागोंदी कारभार आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील आपण खाल्लेला सपाटून मार दोन्हीही शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादन खर्चापेक्षाही कमी भाव मिळण्यात होतो आणि नाईलाजाने त्यांना दरवर्षी रस्त्यावर उतरावे लागते. यावर मखलाशी म्हणून काही सहकार सम्राट, मंत्री म्हणतात की, काय मिळवले आपण निर्यात बंदी उठवून? आणि एवढे आंदोलन करून? कुठे साखरेला भाव आहेत आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत? त्यामुळे ही आंदोलने फारशी कामाची नाहीत इ. सरकारने केलेली निर्णयातील अक्षम्य दिरंगाई त्यांच्या लक्षात येत नाही.

**नन्नाचा पाढा**

मागील वर्षी दिलेल्या पहिल्या हप्त्याची रक्कम काही साखर कारखान्यांनी कशीबशी भागवलेली आहे. हमी किमतीचा दुसरा हप्ताही देण्यासाठी कारखान्यांकडे पैसे नाहीत. तेरणा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आमदार ओमराजे निंबाळकर यांनी तर साखर आणि भंगार विकून शेतकऱ्यांचे देणे देऊ असे म्हटले आहे. साखर आयुक्तांनी गोदामाला टाळे ठोकल्यामुळे साखर विकता येत नाही. भंगार विकायचे तर ते ज्या भावाने खरेदी केले आहे, त्याच भावात विकता येते, कमी भावात विकता येत नाही. भंगारचा भाव हा नेहमीच नव्या वस्तूंपेक्षा कमी असतो. तेही विकता येत नाही. शेतकऱ्यांचे पैसे भागवायला



ज्ञानेश्वर शेलार

आम्ही तयार आहोत; पण सध्या साखरही विकता येईना आणि भंगारही विकता येईना, अशी आमची अवस्था झाली आहे. साखर आयुक्तांचा आदेश आल्याबरोबर आम्ही शेतकऱ्यांचे पैसे देऊ असे म्हटले आहे. कारखान्यांची परिस्थिती किती डबघाईस आलेली आहे आणि साखर काय किंवा भंगार काय? कारखान्यातल्या चोयट्या विकायच्या असल्या तरी सरकारच्या परवानगीशिवाय विकता येत नाहीत. सहकारी साखर कारखाने शेतकऱ्यांचे आहेत. शेतकरी कारखान्यांचे मालक आहेत. सर्व व्यवहार कार्यकारी मंडळ बघते. हा केवळ देखावा आहे. सरकारच्या परवानगीशिवाय काहीही होत नाही.

नुकतीच सरकारने पाच सहकारी साखर कारखान्यांना ३७.२४ लाखांची थकहमी दिलेली आहे. यातील काही कारखाने बंद पडलेले आहेत. पुन्हा चालू होण्याच्या स्थितीत नाहीत, तरीही सरकारने त्यांना सढळ हाताने मदत केली आहे. शिरपूर शेतकरी सहकारी साखर कारखाना, धुळे ४.४५ लाख, मधुकर जळगाव ४.९५, आजरा कोल्हापूर ९.८२, दौलत १३.५५, सिद्धेश्वर औरंगाबाद ५.४७ असे थकहमी दिलेले पाच साखर कारखाने आहेत. यातील काही कारखाने मागच्या गळीत हंगामातही बंद होते आणि या गळीत हंगामातही सुरू होणार नाहीत, मग ही थकहमी कशासाठी? आणि हे पैसे घेऊन हे साखर कारखाने काय करणार आहेत? अशाच प्रकारची थकहमी किंवा सढळ हाताने वारंवार कर्ज वाटप करून राज्य सहकारी बँक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे. तरीही सरकार राजकीय दबावापोटी साखर कारखान्यांचा डोलारा सांभाळीत आहे. शेतकऱ्यांच्या मानेवर मात्र पाय देऊन उभी आहे. त्यांना आता श्वासघेणेही मुश्किल झाले आहे. यंदाच्या गळीत हंगामात ९१ लाख मेट्रीक टन साखर उत्पादन होण्याचा अंदाज आहे. ही समस्या दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे. मागील वर्षाची साखर आणि या वर्षीची उत्पादीत होणारी साखर यांचे काय करावे हा मोठा गंभीर प्रश्न आहे. विक्री आणि उसाच्या भावाचे तर सोडाच ही साखर कोठे ठेवायची हाच मोठा प्रश्न उभा राहणार आहे.

**जाणत्याचे बोल**

२६ तारखेला इस्लामपूर येथे केंद्रीय कृषी मंत्र्यांनी, ''ऊस दर बाजारातच ठरविले जातात, तुम्ही आम्ही ते ठरवित नाही, जागतिक बाजरपेठेत साखर डम्प होऊ नये यासाठी टप्प्या टप्प्याने साखर निर्यातीला परवानगी देण्यात येते. ५ लाख टन साखरेला परवानगी दिलेली आहे. त्यापैकी २.६० लाख टन साखरेची निर्यात झालेली आहे. उसाच्या दराची मागणीही बाजारातच ठरते. उत्पादन खर्चावर दर द्या, अशी मागणी केली तर ती आपण पूर्ण करू शकत नाही. त्यासाठीच वैधानिक किंमत ठरवलेली आहे. सरकारने दुकान उघडलेले नाही, त्यामुळे साखर खरेदी करणेही शक्य नाही,'' असे म्हटले. साखर कारखानदारी संपूर्णपणे सरकारी जोखडातून मुक्त झाली आहे, असेच यातून ध्वनित होते. सर्व काही बाजारातच ठरते. तर साखरेच्या गोदामांना टाळे कोण ठोकते? कर्ज पुरवठा फक्त राज्य सहकारी बँकच कशी करते? साखर किती निर्यात करायची हे सरकार कसे काय ठरवते? या प्रश्नांची उत्तरे कोण देणार? त्यांनीच २४ सप्टेंबरला बारामती येथे किफायतशीर किंमत हा शेतकऱ्यांचा अधिकार आहे. जिथे कुठे चांगली किंमत मिळेल, तिथे शेतीमाल विक्रीस शेतकऱ्यांना अधिकार असलाच पाहिजे. शेतीमालाच्या निर्यातीबाबत गरज नसताना चुकीची भूमिका घेतली जाते. मला कांदा, कापूस, ऊस, गहू, तांदूळ, फळे आदी शेतीमालाच्या भावांसाठी नेहमीच केंद्राशी लढा द्यावा लागतो. शेतकऱ्यांना जगाची बाजारपेठ मिळालीच पाहिजे, असे म्हटले. आता कृषिमंत्र्यांनीच शेतकऱ्यांचा एवढा कैवार घेतला आणि तेच दोन ठिकाणी इतकी उघडउघड वेगवेगळी भूमिका अगदीच एकमेकींच्या विरोधात कशी काय मांडू शकतात? त्याला एवढेच उत्तर द्यावे लागेल, की ते कृषिमंत्री आहे आणि ते काहीही बोलू शकतात. शेतकऱ्यांनी फक्त त्यांचे हे ज्ञानाचे बोल ऐकून आपले उत्पादन वाढवावे आणि दरवर्षी तोटाही वाढवून घ्यावा! काही संघर्षाची वेळ आलीच तर भूजबळांना साकडे घालावे. तेही कांद्याच्या आणि गरज पडली तर उसाच्या प्रश्नावरसुद्धा शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून लढतील. चार-आठ दिवसांनी काही आकडे जाहीर होतील. शेतकरी संघटनेने २१०० रुपये प्रतिटन उसाला भाव द्यावा अशी मागणी केली आहे. ती मागणी मान्यही होईल. शेतातल्या उसाचे गाळप होईल आणि पुन्हा आम्ही तर पहिलाच हप्ता देऊ शकत नाही. तर त्यापेक्षा अधिक देण्याचे कसे शक्य आहे. असे म्हणून मागच्या वर्षीच्या हप्त्यांसाठी जसे शेतकऱ्यांना लढावे लागत आहे. तसेच पुढच्या वर्षीच्या ऊसदरासाठी आणि मागच्या दोन वर्षांच्या हप्त्यांसाठी कदाचित पुढच्या वर्षी पुन्हा रस्त्यावर यावे लागेल.

**कैवारी कोण?**

२६ तारखेला नातेकुते जिल्हा सोलापूर येथे बोलताना उसाला चांगला दर देण्यासाठी पूर्णपणे निर्यातबंदी उठवावी, लेव्ही साखरेचे प्रमाण कमी करावे, आयात साखरेवर ४०% कर लावावा, असे राज्याचे सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील म्हणाले आणि हे सर्व त्यांनी पुन्हा शेतकऱ्यांनाच सांगितले. शेतकऱ्यांनी सरकारकडे मागावे आणि तेच मंत्र्यांनी सरकारने असे केले पाहिजे, तसे केले पाहिजे असे येऊन त्यांनाच सांगावे. असा हा खेळ चालला आहे. त्यांना हा प्रश्न मांडायचाच असेल, तर त्यांनीच तो सरकारमध्ये मांडायला हवा. ज्यांनी सरकारमध्ये प्रश्न मांडायचा तेच आपण शेतकऱ्यांचे कैवारी आहोत, असे भासविण्यासाठी शेतकऱ्यांच्या सभांमध्ये येऊन सरकारने काय करावे ते सांगतात. ही मोठी गमतीची बाब आहे.

**उत्तर काय?**

साखर कारखानदारी सरकारी जोखडातून मुक्त करणे. खासगी उद्योगांना साखर कारखानदारीत येण्यास परवानगी देणे. आयात-निर्यातीचा खेळखंडोबा थांबवून उसापासून होणारे सुमारे १४-१५ ते पंधरा प्रकारचे बायप्रॉडक्टस तयार करणे. पैकी सध्या अल्कोहोल, इथेनॉल, वीजनिर्मिती, कागद इत्यादी बायप्रॉडक्ट्स आहेत; परंतु मुख्य उत्पादन हे साखरेचे आहे. हे बायप्रॉडक्ट्स उसापासून सरळ सरळ तयार करणे, काही प्रमाणात साखरेचा टप्पा वगळणे.

कारखान्यांचे आधुनिकीकरण करून ते राजकारणाचे अड्डे राहणार नाहीत याची काळजी घेणे. इत्यादी उपाय तातडीने करण्याची गरज आहे. तरच शेतकऱ्यांना पुन्हा पुन्हा रस्त्यावर येण्याची गरज पडणार नाही. नसता आज ना उद्या रस्त्यावर उतरलेले शेतकरी संचालक मंडळांच्या घरासमोर टिपरू घेऊन उभे राहिल्याशिवाय राहणार नाहीत.

**ज्ञानेश्वर शेलार**
मो. ९२२६७९७०१८


■■

# शेतकरी आंदोलन दशा आणि दिशा

**एकशे वीस कोटी लोकांना दोन वेळचं अन्न पुरवण्याचं वन सायडेड टेंडर शेतकऱ्यांनी भरलं आहे. सोनिया गांधींना देशातील ७५% लोकांना अन्न सुरक्षेच्या रूपात ९० कोटी लोकांना फुकट धान्य हवे आहे. सद्याच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेत ४०% धान्य काळ्या बाजारात विकले जाते. नेपाळ, बर्मा, बांगला देश, पाकिस्तान या देशात 'स्मगल' होते. याची किंमत फक्त शेतकऱ्यांनी का मोजायची? सहाव्या वेतन आयोगाच्या लाभार्थ्यांनी, कॉर्पोरेट सेक्टरने का मोजायची नाही? दोन टक्के सरकारी कर्मचाऱ्यांना बजेटच्या ६५% प्रोव्हिजन तर ६५% शेतकरी समाजासाठी बजेटमध्ये २% च तरतूद! अनुत्पादकांना मलिदा आणि पोशिंद्याला गळफास. यालाच कलियुग म्हणायचे का? हे अर्थचक्र प्रवर्तन कोण फिरवणार?**

विज्ञान आणि तंत्रज्ञानात गेल्या वीस वर्षांत प्रचंड क्रांती झाली आहे. दिवाळीच्या शुभेच्छा आता संगणकाद्वारे, फिरत्या दूरध्वनीद्वारे पाठविल्या जातात. देशातील सत्तर कोटी लोकांजवळ फिरते दूरध्वनी आहेत. गरीब अल्पभूधारक, कोरडवाहू, शेतकरी ८०% आहेत. एक हजार रुपयांच्या आसपास उपलब्ध असलेलं हे यंत्र आता अनेक शेतकऱ्यांकडे पाहायला मिळते. यंदाच्या दिवाळीत त्यातील काही मोजक्या शेतकरी आयाबहिणी 'इडा पिडा टळो, बळीचं राज्य येवो' असा संदेश नक्कीच पाठवतील...

बळिराजा शेतकऱ्यांचा राजा होता. शेतकरी राज्याचा राजा होता. बळी प्रतिपदेला नवीन वर्षाची सुरुवात होण्याचा प्रघात आहे. केरळात बळीराजाचं मंदिर आहे. एकमेव... त्यावेळी शेतकरी सुखी असला पाहिजे. अलीकडे झेड. पी. च्या विद्यार्थ्यांच्या रोडावलेल्या संख्येच्या शाळेत 'शेतकरी सुखी तर जग सुखी' अशा ओळी भिंतीवर लिहिलेल्या; पण पुसटशा दिसतात. देशाला स्वातंत्र्य मिळालं. खान्देशची माऊली साने गुरुजी संत साहित्यिक रान उठवत होते. रान पेटवत होते. शेतकऱ्यांच्या राज्यासाठी प्राणपणाला लावून शेतकऱ्यांना स्वातंत्र्य चळवळीत खेचत होते. फैजपूर काँग्रेसच्या यशस्वीतेसाठी त्यांनी जीवाचं रान केलं होतं. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांनी स्वतःच आपली प्राणज्योत मालवून टाकली. जणू लाखभर शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा अटळ योग आधीच त्यांच्या दूरदृष्टीला जाणवला असावा. म. गांधींनी तर १९४७ नंतर पं. नेहरूंचे सोव्हिएत समाजवादी प्रताप बघून त्यांना नोटीस वजा पत्रच पाठविले होते आणि त्यांच्या विरुद्ध आंदोलनाची धमकी दिली होती. उत्तम शेती पं. नेहरू कनिष्ठ करायला निघाले होते. त्यांना सत्ता टिकविण्यासाठी, वर्षानुवर्षे घराण्यातच सत्ता राहावी म्हणून, नोकरदारी, नोकरी श्रेष्ठ करायची होती. हे नियोजनाचं पाप त्यांनी देशाच्या माथी मारलं. सद्या दूध ४० रुपये लिटर आहे. ते लवकरच १०० रु. लिटर होणार आहे. हेही नेहरू आणि त्यांच्या घराण्याचं पातक!



रवी देवांग

स्वातंत्र्यापूर्वी शेतीला प्रतिष्ठा होती. दोन परतन जमीन नसेल तर लग्नाच्या पोरी पोरांना मिळत नसत. आता शेतकऱ्यांच्या पोराशी कोण पोरगी लग्न करायला तयार आहे? देश स्वतंत्र झाला, खेडी परावलंबी झाली. देश स्वतंत्र झाला. शहरं कारखानदारी वाढली. शेती, शेतकरी, ग्रामोद्योग उद्ध्वस्त झालेत. हा काळाचा महिमा नाही. हे ठरवून केलेले शोषण आहे, दोहन आहे.

सर छोटूरामपासून शरद जोशींपर्यंत म. फुले- विठ्ठल रामजी शिंदेंपासून शरद जोशींपर्यंत, शेतकरी आंदोलन हे प्रस्थापितांविरुद्धचे बंड होते. जे इतर बंडांचे झाले तेच याही बंडाचे झाले. यामागे केवळ अविद्याच किंवा कर्मविपाक नाही तर ठरवून केलेले हे शोषण होते आणि आजही सुरूच आहे.

मध्यंतरी रामदेवबाबा आणि अण्णा हजारे यांनी उपोषणाद्वारे आंदोलन केले. दोन्ही आंदोलनाचा केंद्रबिंदू शेतकरी नव्हता. सत्तर टक्के ग्रामीण शेतकरी बहुजन समाज आजही हलाखीचे जीवन जगतो आहे. एका दाण्याचे शेकडो दाणे करणारा किमयागार दुःखी आहे. लाचार आहे. कर्जबाजारी आहे, शोषित आहे, उपेक्षित आहे आणि आत्महत्याप्रवण आहे.

याचं मूळ कारण शेतकऱ्याला स्वातंत्र्य नाकारणं हे आहे. एकशे वीस कोटी लोकांना दोन वेळचं अन्न पुरवण्याचं वन सायडेड टेंडर शेतकऱ्यांनी भरलं आहे. सोनिया गांधींना देशातील ७५% लोकांना अन्न सुरक्षेच्या रूपात ९० कोटी लोकांना फुकट धान्य हवे आहे. सद्याच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेत ४०% धान्य काळ्या बाजारात विकले जाते. नेपाळ, बर्मा, बांगला देश, पाकिस्तान या देशात 'स्मगल' होते. याची किंमत फक्त शेतकऱ्यांनी का मोजायची? सहाव्या वेतन आयोगाच्या लाभार्थ्यांनी, कॉर्पोरेट सेक्टरने का मोजायची नाही? दोन टक्के सरकारी कर्मचाऱ्यांना बजेटच्या ६५% प्रोव्हिजन तर ६५% शेतकरी समाजासाठी बजेटमध्ये २% च तरतूद! अनुत्पादकांना मलिदा आणि पोशिंद्याला गळफास. यालाच कलियुग म्हणायचे का? हे अर्थचक्र प्रवर्तन कोण फिरवणार?

अण्णा हजारे आणि रामदेव बाबा ही फार मोठी माणसं! काळं धन भ्रष्टाचार वगैरे बोलबाल बोलतात किंवा मौन उपोषण करतात. कृषी, अर्थ क्षेत्रांतला सर्वांत मोठा भ्रष्टाचार यांना कसा दिसत नाही? मीडियाला दिसत नाही. हे आपण समजू शकतो... त्यांना टीआरपीची चिंता आहे; पण या महामानवांचं काय? काळे धन आले तर किती पैसा येईल. एकावर किती शून्य द्यायचे? हे गरिबाला समजत नाही. एका दाण्याचे शेकडो दाणे तयार झाल्यावर तलाठी पासून मार्केट कमीटीच्या गुंडांपर्यंत त्याचे ७२% दाणे लुटले जातात. यालाच शेतकरी संघटनेनं उलटी पट्टी म्हटलं. अर्थशास्त्राच्या भाषेत निगेटीव्ह सबसिडी म्हटलं. अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकरांना हे कळलं नाही. साहजिकच आहे, कसं कळणार? जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे- दाईला आईच्या गर्भप्रसव वेदना कशा कळणार? तसाच अण्णा बाबांना कृषी क्षेत्रातला भ्रष्टाचार काय डोंबलं कळणार?

उसाचे उदाहरण घेऊ... महाराष्ट्रात २०० साखर कारखाने. १६० सहकारी, ४० खासगी, गतवर्षीचा सर्वोत्तम ऊस दर कागल कारखान्याने दिला. २७०० रु. प्रतिटन. या दराच्या आसपास दर देणारे जेमतेम १५-२० कारखाने. शासनाने हर्षवर्धन देशमुख यांनी गोपीनाथ मुंडेंच्या उपस्थितीत रघुनाथदादा आणि राजू शेट्टी यांच्याशी चर्चा करून विदर्भ-मराठवाडा खानदेशातील उसाला १७५० रु. प्रतिटन द्यावेत असे सांगून गतवर्षीचे आंदोलन संपवले... शेतकरी संघटनेस जिचे संस्थापक शरद जोशी आहेत, शासन मोजत नाही. किंमत देत नाही. फुटीरांना महत्त्व देणं ही इंग्रजांची नीति... पंडित नेहरू, बाबू जगजीवनराम यांना बाबासाहेब आंबेडकरांच्या तुलनेत खूप बक्षिसी देत व त्यांना पुढे केंद्रीय संरक्षण मंत्र्यापर्यंत नेऊन बसवलं. दादा आणि राजू यांचे राजकीय भवितव्य उज्ज्वल आहे, पण आंदोलक म्हणून त्याची विश्वासार्हता दिवसेंदिवस वाढत राहे ही सदिच्छा! महाराष्ट्रातील १०० साखर कारखाने आजारी, अकार्यक्षम- त्याचे मूळ कारण भ्रष्टाचार... पुढाऱ्यांनी राज्य बँकेचं दिवाळं वाजवलेलं. तिला प्रशासक लावला आर.बी.आयने आणि पवार काका-पुतण्यांचा केवढा तिळपापड झाला! अनेक कारखान्यांनी कसाबसा १५००रु. प्रतिटन एवढा भाव दिला. या दरात खान्देशात चारासुद्धा मिळत नाही. परिणामी दूध महाग. ते वेगळेच...

देशात कोणतीही वस्तू कमी अधिक फरकाने ४-५ टक्के कमी जास्त दरात विकली जाते; पण ऊस उत्पादक जवळपास सर्वोच्च दराच्या निम्म्या किमतीत देतात. ही लूट २जी स्पेक्ट्रम घोटाळ्यापेक्षा जास्त आहे. स्वातंत्र्यानंतर दरवर्षी दिवसाढवळ्या शेतकऱ्यांवर घातलेला हा दरोडा! गतवर्षी ६०० लाख टनांचे गाळप झाले. (संदर्भ- साखरतज्ज्ञ अजित नरदे) हजार रुपये फरकाचे जाऊ द्या; सरासरी अकार्यक्षमता, अनियमितता, खोटे हिशेब, दलाली, कमिशन, इत्यादींद्वारे शेतकऱ्याचे टनामागे ३०० रुपये खाल्ले गेले आहेत. ही रक्कम एकाच वर्षी एकाच पिकात सुमारे २ लाख ४८००० कोटी रुपये इतकी होते. आता बोला! कंट्रोलर अँण्ड ऑडीटर जनरल ऑफ इंडिया ऊर्फ कॅग या सरकारी संस्थेने मुंबई हायकोर्टाला अहवाल सादर केला आहे. त्यात खूप गमतीजमती आहे. एका डबल आम्लेटची किंमत ८०० रुपये आहे. व्हाऊचर पद्धत... बारदान, मळी, साखरेच्या मलिद्यावरच आमदार निवडून येतात याचे नाव विना सहकार नहीं उद्धार!!

कापसाची कहाणी याहीपेक्षा भयंकर. लेखणीच्या एका फटक्यात ६००० रु. प्रति क्विंटलचा भाव निर्यातबंदी ३००० रुपये प्रति क्विंटल चौकशी झाली तर कनिमोळी मागे दयानिधी मारन गजाआड दिसतील. सद्या शेतकरी आंदोलन घुमसते आहे. सर्वांनी एकत्र येणे आवश्यक आहे. प्रत्येकाचा वेगळा सवतासुभा. धाकटी पाती उभी राहणं हे बरोबर नाही. संघटना कुणाच्या पिताश्रींची नाही, ही भाषा बरी नाही. चौदा राज्यांतील किसान समन्वय समिती ही एक आशा आहे. गेली ३० वर्षे शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याचा शेतकऱ्यांच्या उद्योजकतेच्या स्वातंत्र्याचा लढा ती लढते आहे. शेतकरी संघटना देशपातळीवरील छोट्यामोठ्या सर्व संघटनांचे संयोजन करीत आहे. त्यासाठी रामदेव बाबा यांच्याशी व अण्णा हजारेंच्यादेखील संपर्कात आहे. शेतकरी संघटनेचा विचार, स्वातंत्र्यावर व सत्यावर आधारित आहे. त्यासाठी संघटनेने जात-पात, धर्म, पंथ, भाषा आदी क्षुद्र बंधने झुगारली आहे. अन्यायकारी नवीन भूमी संपादन कायदा निमित्त ठरणार आहे. मालमत्तेचा मूलभूत अधिकार मिळविण्यासाठी शेतकरी सज्ज होत आहे आणि हीच उद्याच्या पिढीची आशा आहे. शेतकरी आंदोलनाची, बळिराज्याच्या दिशेने केलेली वाटचाल, सरकारशाही, सहकारशाही, नोकरशाही मुर्दाबाद करीत, शेतकऱ्याला बाजारपेठेचे व तंत्रज्ञानाचे स्वातंत्र्य प्राप्त करून देणे हीच शेतकरी आंदोलनाची दिशा आहे.

**रवी देवांग**
अध्यक्ष शेतकरी संघटना (महाराष्ट्र)
मो. ९४२२२९६३५८

# भारतातील लोकशाहीकरण : एक समस्या

**[ लोकशाहीकरणाबरोबर होणारा महत्त्वाचा फायदा म्हणजे तत्कालिन प्रश्न व समस्यांवर पक्षांची भूमिका व जनमत काय आहे याचे प्रतिबिंब याचे प्रातिनिधिक सार्वमत या निवडणुकांमधून व्यक्त होऊ शकेल. जनमतानुसार पक्षांना, विशेषतः सत्ताधारी पक्षाला आपले निर्णय करावे लागतील, भूमिका घ्याव्या लागतील, हा एक मोठा फायदा यात दिसतो. शिवाय लोकानुयय करणारे व आश्वासने देऊन न पाळणारे पक्ष सावध होतील, कारण लागलीच दुसऱ्या निवडणुकीस सामोरे जावे लागणार असल्याने असले प्रकार आपोआपच बंद होतील. ]**

भारत हा जगातील, लोकशाही स्वीकारलेला एक मोठा देश म्हणून ओळखला जातो. सरंजामशाहीतून पारतंत्र्यात गेलेल्या व कालांतराने स्वतंत्र झालेल्या देशांना उपलब्ध पर्यायांतून तसा नवीन व फारसा वादग्रस्त नसलेला लोकशाहीचा पर्याय निवडावा लागल्याने अनेक देशांनी तो स्वीकारलादेखील. यापूर्वीच लोकशाही स्वीकारलेल्या व नांदवणाऱ्या देशांची उदाहरणे समोर असतानाच लोकांची, लोकांसाठी, लोकांकरवी हे लोकशाहीचे ब्रीदवाक्यच साऱ्या नागरिकांना लुभावणारे व आश्वासक वाटल्याने आता आपली सत्ता आली म्हणजे नवराष्ट्र हे सर्वांना हितकारी ठरेल हा भाबडा आशावादही त्यामागे होता. मात्र लोकशाही स्वीकारणे व ती अंगिकारणे यातली तफावत लक्षात न आल्याने व केवळ लोकशाही स्वीकारल्याने सारे प्रश्न सुटतील असे गृहीत धरल्याने आज आपल्याला लोकशाही असूनदेखील एक सर्वव्यापी जनअसंतोषाला सामोरे जावे लागते आहे. एका वेगळ्याच संस्कृतीत वाढलेल्याने नवीन धर्म स्वीकारावा आणि त्या धर्माची शिकवण वा तत्त्वे न पाळता केवळ धर्म स्वीकारला म्हणून उद्धाराची वाट पाहावी आणि अपेक्षाभंगाने स्वीकारलेल्या पर्यायावरच शंका व्यक्त करावी असे आपल्या सर्वांचे झाले आहे असे वाटते.

मुळात भारतीय जनमानसाचा पिंड हा राजकीय नाही. राजकारण करावे ते राजेरजवाड्यांनी व त्यात असलेल्या संबंधितांनी हा पिढ्यान्‌पिढ्यांचा संस्कार अचानक पुसला जाणार नव्हता. आजवर शोषीताची भूमिका बजावत आलेल्यांच्या मनात सरकार या व्यवस्थेबद्दलची भीती व मायबाप असल्याचा आदरही असायचा. त्यातूनही या लोकशाहीत लोकसहभागाची व्याप्तीही एकदा निवडून दिले की, आपले कार्य संपले यापुरतीच मर्यादीत राहत गेल्याने जनताही आपल्या सहभागाची गरज व अधिकार हळूहळू विसरत व गमावत गेली. यात कोणाचा दोष असण्यापेक्षा याची परिणती कशात होईल हे लक्षात न आल्याने एक नैसर्गिक वाटचाल म्हणूनही समजता येईल; परंतु या रस्त्याने आपण कुठे येऊन ठेपलो आहोत व यात काहीतरी चुकते आहे अशी भावना मात्र आज सर्वदूर निर्माण झाली आहे हे वास्तव आहे.



**गिरधर पाटील**

सर्वसामान्य जनतेचा व लोकशाही प्रक्रियेचा तसा सरळ संबंध येतो तो निवडणुकीत व तोही पाच वर्षांतून एकदा. एकदा निवडणुका आटोपल्या, की साऱ्यांचे लक्ष निवडून आलेले आपल्यासाठी व आपल्या नावाने काय काय करतात याकडे. मात्र एकदा अधिकार दिल्याने त्यात ढवळाढवळ करणे संसदीय लोकशाहीचा बागुलबुवा दाखवत अशक्यप्राय होत गेल्याने बदलासाठी पाच वर्षे परत वाट पाहणे हाती उरते. या पाच वर्षांत घडणाऱ्या घटनांचा आवाका व वेग बघता पुढच्या निवडणुकांच्या वेळी नेमकी काय परिस्थिती असेल हेही अनिश्चित. शिवाय निवडणुकांवर स्वार होणाऱ्या कुणाच्या तरी अकस्मात मृत्युची सहानुभूती, परकीय आक्रमण, आर्थिक वा दहशतवादी अरिष्टांच्या लाटा यात नेमक्या जनतेच्या आशा आकांशा व्यक्त होतीलच असे होत नाही.

यावरचा एक उपाय म्हणून नागरिकांचा या लोकशाही प्रक्रियेशी अधिकाधिक संबंध कसा आणता येईल हे पाहणे व भारतासारख्या महाकाय देशाच्या साऱ्या राजकीय, सामाजिक, आर्थिक निर्णयप्रक्रिया या पाच वर्षीय कालखंडात अडकवून न ठेवता तत्कालीन परिस्थितीच्या गरजा व लोकेच्छा यांसह प्रवाही कशा होतील हे पाहणे आवश्यक ठरेल. यासाठी करावे लागणारे बदल वा सुधार हे मूलगामी स्वरूपाचे असल्याने सुरवातीला नैसर्गिक न्यायानुसार ते धक्कादायक वाटतील व

स्वीकारण्यातही स्थितीवाद्यांना जड जाईल तरीही ते अपरिहार्य असल्याने त्यांचा विचार होणे आवश्यक आहे.

निवडणुका या केवळ मतदानाशी निगडीत नसतात. त्यावेळचे देशासमोरचे प्रश्न, त्यावर घेतलेल्या विविध पक्षांच्या विविध भूमिका, त्या निमित्ताने घडणारे वैचारिक मंथन यांनी सारा देश ढवळून निघत असतो. अगदी ज्याला राजकारणात काही रस वा गम्य नाही असाही सभोवताली काय चालले याबद्दल उत्सुक असतो. म्हणजेच निवडणूक काळात सारे वातावरण राजकीय दृष्ट्या कसे भारावलेले असते. सर्वसामान्यांना राजकीय शिक्षित करण्याची ही वेळ असते आणि जे काही लोकशाहीकरण होते ते याच काळात होत असल्याचे दिसून येईल. म्हणजे असे वातावरण जेवढा काळ वाढवता येईल तेवढी लोकशाही जनमानसात रुजण्याची शक्यताही वाढत असल्याचे दिसून येईल.

सध्या आपण ५४० खासदारांच्या निवडणुका, ज्यात नागरिकांचा सरळ संबंध येतो, दर पाच वर्षांनी एकाच वेळी घेतो. या निवडणुका जर लोकप्रतिनिधींचे घटनादत्त अधिकार न डावलता जर ठराविक कालावधित टप्प्याटप्प्याने घेतल्या तर देशात बऱ्याच काळ ही लोकशाहीकरणाची प्रक्रिया राबवता येईल. यात सातत्य व गतिमानता ठेवतानाच प्रत्येक खासदाराला त्याचा पाच वर्षाचा प्रातिनिधित्वाचा कालखंड पूर्ण करता यावा व कुठल्याही काळात लोकसभेत ५४० खासदारांची उपस्थिती हे दोन महत्त्वाचे निकष पाळता येतील.

संकल्पना अधिक सोपी करण्यासाठी एक उदाहरण घेता येईल. पाच वर्षांच्या कालखंडात ६० महिने येतात. या काळात जर ५४० खासदार निवडून आणायचे असतील तर दर वर्षी १८० खासदार निवडता येतील. म्हणजे या वर्षी निवडलेले १८० खासदार त्यांची ५ वर्षांची मुदत पूर्ण करून बरोबर पाच वर्षांनी त्यांचे मतदारसंघ पुढच्या निवडीसाठी तयार राहतील. अशा रीतीने दरवर्षी वेगवेगळे मतदारसंघ खुले करून संपूर्ण भारतात कायमस्वरूपी लोकशाहीकरणाला पूरक असे वातावरण निर्माण करता येईल. मात्र ही लोकसभा दहावी, अकरावी वा बारावी असे संबोधता येणार नाही, कारण सतत कुठल्याही वेळी कायमस्वरूपी खासदार यात उपस्थित असतील.

सुरुवातीला काही घटनात्मक पेच येऊ शकतील. यात निवडणुका लांबवण्याचा अधिकार वापरता येईल. लोकसभेची मुदत संपल्यानंतर ही पद्धत स्वीकारताना दरवर्षी लॉटरी पद्धतीने मतदारसंघ निवडून त्यात निवडणुका घेता येतील. तोवर इतर सर्वांना त्यांची पाळी येईपर्यंत मुदतवाढ देण्यात येईल. एकदा पहिले चक्र पूर्ण झाले की लॉटरी पध्दतीची गरज रहाणार नाही, कारण पाच वर्षांची मुदत पूर्ण झालेले मतदारसंघ निवडणुकीला तयार असतील.

लोकशाहीकरणाबरोबर होणारा महत्त्वाचा फायदा म्हणजे तत्कालिन प्रश्न व समस्यांवर पक्षांची भूमिका व जनमत काय आहे याचे प्रतिबिंब याचे प्रातिनिधिक सार्वमत या निवडणुकांमधून व्यक्त होऊ शकेल. जनमतानुसार पक्षांना, विशेषतः सत्ताधारी पक्षाला आपले निर्णय करावे लागतील, भूमिका घ्याव्या लागतील, हा एक मोठा फायदा यात दिसतो. शिवाय लोकानुयय करणारे व आश्वासने देऊन न पाळणारे पक्ष सावध होतील, कारण लागलीच दुसऱ्या निवडणुकीस सामोरे जावे लागणार असल्याने असले प्रकार आपोआपच बंद होतील.

सध्या या निवडणुकांशी संबंधित असणारा निवडणुक आयोग, त्यात सहभागी होणाऱ्या सरकारी यंत्रणा, राजकीय पक्ष, माध्यमे या साऱ्यांवर एकत्रित निवडणुकांचा अचानकपणे ताण येतो. या गोंधळाच्या वातावरणात मतदारही भांबावल्याने निर्णयक्षम राहत नाहीत. निवडणुक आयोगाच्या क्षमता लक्षात घेता मतदारसंघात एकादा निरीक्षक पाठवण्या पलीकडे त्यांना या निवडणुकांवर नियंत्रण ठेवता येत नाही. शेवटच्या दिवसापर्यंत मतदार याद्या सदोष असतात. सनदी अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली तयार होणाऱ्या याद्या सहेतूकपणे तशा ठेवल्या जातात असा आरोप होतो. प्रशासनही मनुष्यबळ व वेळ कमी असल्याच्या आड लपते. आताच मतदारसंघात निवडणुका असल्याने अशा सबबी त्यांना सांगता येणार नाहीत. एकत्रित घेण्यात येणाऱ्या निवडणुकांतील धांदलीचा गैरफायदा घेऊन अनेक लोकशाहीविरोधी कृत्ये केली जातात. प्रशासन व पोलिस यंत्रणेचा ताण कमी झाल्याने ते अधिक कार्यक्षमतेने या समस्या हाताळू शकतील.

महत्त्वाचा भाग म्हणजे साऱ्या राजकीय पक्षांना सुसंघटीत होऊन निवडणुकांना सामोरे जाता येईल. आपली संसाधने, क्षमता, प्रचारक, वक्ते, वाहने या ठराविक मतदारसंघात त्यांना सुयोग्यपणे वापरता येतील. माध्यमांना सर्व पक्षांना योग्य जागा व वेळ देता येईल. पेड न्यूजसारखे प्रकार आटोक्यात येतील. पाच वर्षांतील एक संधी अशी पक्षांना जी तातडी वा निकड तयार होऊन येनकेन प्रकारे निवडून यायचेच म्हणून होणारी गुंडागर्दी वा दडपशाही आटोक्यात येईल, कारण जनताही तेवढीच सुसंघटीत झालेली असेल.

म्हणजे अत्यंत शांत परिस्थितीत शांत डोक्याने या निवडणुका पार पडल्या तर जनतेच्या लोकशाहीकरणाबरोबर जनमताचे योग्य ते प्रतिबिंब सदासर्वकाळ संसदेत पडत असल्याने व जनाधाराची टांगती तलवार सतत डोक्यावर असल्याने राजकीय पक्षांच्या मनमानीने भारतीय लोकशाहीला जे साचलेपणाचे वा साचेबंदपणाचे स्वरूप आले आहे ते जाऊन एक प्रवाही गतिमान लोकशाही अस्तित्त्वात येऊ शकेल असे वाटते.


*(दै. लोकसत्ता दि. २५ सप्टेंबर २०११ मधून साभार)*

**डॉ. गिरधर पाटील**
girdhar.patil@gmail.com

# शेतकऱ्यांचे दुय्यम नागरिकत्व

**[ शेतकऱ्यांची अनेक आंदोलने झालीत, मोठमोठी आंदोलने झालीत व आर्थिक यश काही प्रमाणात पदरीही पडले, पण राज्यकर्त्याला आव्हान मिळेल अशी राजकीय ताकद शेतकऱ्याला कधी दाखविता आलीच नाही. कोणाची मागणी नसताना कांद्याचे भाव पाडण्यासाठी सरकारने निर्यातबंदी लादली, कारण सरकारला एका गोष्टीची खात्री आहे, शेतीमालाचे भाव पडले तरी सरकारला धोका निर्माण होणार नाही, पण भाव वाढले तर मात्र सरकार अडचणीत येईल. शेतकरी विरोधी धोरण सरसकटपणे राबविल्या जाण्यामागचे हे एक महत्त्वाचे कारण आहे. ]**

सिव्हिल सोसायटीचे भव्यदिव्य आंदोलन संपते न संपते तोच नाशिक जिल्ह्यात कांदा उत्पादक शेतकऱ्याचे आंदोलन उभे राहिले. योगायोगाने दोन्ही आंदोलने तेरा दिवस चाललीत. रामलीला मैदानात जमलेली गर्दी व नाशिक जिल्ह्यात रस्त्यावर उतरलेले शेतकरी यांच्या संख्येत थोडाफार फरक असला तरी दोहोंची संख्या लक्षणीय होती हे साम्य मान्य करावे लागेल; पण परिणामांच्या दृष्टीने या दोन्ही आंदोलनांत जमीन अस्मानाचा फरक होता. रामलीला मैदानातील गर्दीने सर्व शक्तिमान सरकार व संसदेला नाक मुठीत धरायला भाग पाडले तर सरकारने कांदा उत्पादकाचा कांदा सडवून आंदोलकांनाच नाक मुठीत धरून ठेवण्याची पाळी आणली. कारण उघड आणि स्पष्ट आहे. दिल्लीत जमलेली गर्दी ही इंडियाची होती. नाशिकच्या रस्त्यावर उतरलेली गर्दी ही अभागी भारताची होती. म्हणूनच रामलीला मैदानावरील गर्दीची दखल क्षणा-क्षणाला रात्रंदिवस सर्वांकडून घेतली जात होती. रामलीला मैदानावरची गर्दी ही अपूर्व चमत्कार समजून चमत्काराला नमस्कार केला जात होता. नाशिकच्या गर्दीकडे मात्र 'रोज मरे त्याला कोण रडे' या भावनेतून उपेक्षेने पाहिले गेले. काळे आणि गोरे यांच्यातील ऐकीव भेदाचे प्रत्यक्ष जवळून दर्शन या दोन आंदोलनाने घडविले आहे. सरकारची या दोन आंदोलनांकडे बघण्याची व ते हाताळण्याची तऱ्हा बघितली की जॉर्ज ऑरवेलची 'सर्व समान आहेत पण काही अधिक समान आहेत ' या उक्तीची आठवण झाल्याशिवाय राहत नाही; पण आपल्या देशाच्या संदर्भात या उक्तीतून पूर्ण सत्य प्रकट होत नाही. देशभरातील शेतकरी समाज नजरेसमोर आणला तर 'सर्व समान आहेत पण काही जन्मतःचं असमान आहेत' असे जॉर्ज ऑरवेलच्या उक्तीचे रुपांतर सत्याला धरून होईल. संविधानाने सर्वांना समान दर्जा दिला असला तरी काही जन्मतःच अपंग जन्मतात तसे असमान म्हणूनच जन्म घेत असतील तर त्याला संविधान तरी काय करणार? दलित, स्त्रिया आणि शेतकरी हे समाजातील तीन घटक असे आहेत की यांचा जन्म घेणे म्हणजे दुय्यम नागरिकत्वाचा स्वीकार करणे होय. अर्थात दलित आणि स्त्रिया यांची लक्षणीय संख्या दुय्यम नागरिकत्व झुगारून पुढे जाण्यात यशस्वी होताना दिसत असली तरी उपजिविकेसाठी शेतीवर अवलंबून असलेल्या समाजाच्या परिस्थितीत व दर्जात काहीच बदल झाला नाही. किंबहुना तसा बदल होणार नाही याची सतत दक्षता घेतली जाते. आता हेच बघा ना. सिव्हिल सोसायटी आणि सरकार अगदी एकमेकाचे हाडवैरी असल्यासारखे भांड-भांड भांडले. तरीही सरकारला सिव्हिल सोसायटीची एवढी काळजी की कांद्याचे भाव फक्त २०-२५ रुपये किलो झाल्याबरोबर केंद्र सरकारने कांद्याची निर्यात बंद करून टाकली. सिव्हिल सोसायटीला खुश करण्यासाठी शेतकऱ्याला मातीत गाडायला सरकार तत्परतेने तयार झाले. सरकारला आपल्या निर्णयाचा काय परिणाम होईल याचा साधा विचार करण्याची गरज वाटली नाही. परिणाम दिसू लागल्यावरही पुनर्विचार करण्याची निकडही वाटली नाही. सिव्हिल सोसायटीच्या आंदोलनाची कोंडी फोडण्यासाठी केवढी धावपळ! या उलट कांदा आंदोलनाची कोंडी फोडण्यात एकदम दिरंगाई. स्वतःचा चुकीचा निर्णय बदलण्यास सरकारला तेरा दिवस वेळ मिळाला नाही.



सुधाकर जाधव

शेतकरी हे उपेक्षित व दुय्यम नागरिक आहेत याची सरकारने कांदा आंदोलनाच्या निमित्ताने पुन्हा एकदा प्रचिती आणून दिली. आणखी एका गोष्टीची या निमित्ताने प्रचिती आली. सिव्हिल सोसायटीने दाखविलेल्या ताकदीचा शेतकऱ्याला फायदा झाला नाही. उलट सिव्हिल सोसायटीच्या धसक्या पायी सरकारने शेतकऱ्याला बळीचा बकरा बनविला!

### अनर्थकारी व अविचारी निर्णय

चातुर्मासात कांदा महाग असणे ही नित्याची बाब आहे. पूर्वी तर कांद्याची या दिवसात उपलब्धता कमीच असायची. कदाचित त्या कारणाने आपल्या पूर्वजांनी चातुर्मासात कांदा वर्ज्य मनाला असेल; पण आता या दिवसामध्ये चार पैसे जास्त भाव मिळू शकतो हा अंदाज आल्याने बरेच शेतकरी थोड्या प्रमाणात का होईना पण कांदा साठवून ही वेळ साधून बाजारात आणू लागले आहेत. यात धोका जास्त आहे. या दिवसात कांदा सडण्याचे प्रमाण लक्षात घेतले तर धोका आपल्या लक्षात येईल. या दिवसातल्या विक्रीतून नेहमीचा तोटा भरून काढण्याचा शेतकरी प्रयत्न करतो. साधारणपणे किलोमागे ९-१० रुपये शेतकऱ्याच्या पदरी पडले तर बदलत्या व लहरी हवामानात कांदा उत्पादक तग धरून राहू शकतो. ऐन हंगामात असा भाव मिळतच नाही. हंगाम नसताना मिळू शकतो तो मिळू द्यायचा नाही हे सरकारचे नेहमीचे धोरण राहत आले. या धोरणाचा भाग म्हणूनच ही निर्यात बंदी आहे. गेल्या वर्षीचे वाढलेले भाव लक्षात घेतले तर त्या तुलनेत सध्याचे भाव आकाशाला भिडले असे अजिबात नव्हते; पण अण्णा आंदोलनातून माध्यमं व उच्च मध्यमवर्गीयांनी दाखवून दिलेली ताकद, या आंदोलनातून निर्माण झालेला सरकारविरुद्धचा असंतोष यात सरकारला आणखी भर नको होती. म्हणूनच दिल्लीत २० रुपये किलो भावाने विकला जाणारा कांदा २५ रुपयांपर्यंत गेल्या बरोबर सरकारने निर्यात बंदी लादली. अचानक आणि तातडीने बंदी घालण्यासाठी दुसरे कोणतेच कारण नव्हते. आयात आणि निर्यात या संबंधीचे करार बरेच आधीपासून होत असतात. अशा करारांची पूर्तता झाली नाही तर आंतरराष्ट्रीय व्यापारात पत शिल्लक राहत नाही. दुसऱ्या वेळी तुमच्याशी करार करायला कोणी तयार होत नाही. त्यामुळे निर्यातीच्या स्पर्धेत आपोआप देश मागे पडतो. आपला कृषीप्रधान देश शेतीमालाच्या व्यापारात मागे आहे ते सरकारच्या अशा बेजबाबदार, अविचारी निर्णयांमुळे. काळा पैसा उघड करायची वेळ येते तेव्हा हेच सरकार आंतरराष्ट्रीय करार पाळणे किती बंधनकारक असते असे साळसूदपणे सांगते. शेतीमालाच्या व्यापाराबाबतीत आंतरराष्ट्रीय करार पाळण्याचा प्रश्न मात्र सरकारसाठी महत्त्वाचा नसतो! निर्यातीसाठी बंदरात पाठवायच्या कांद्याचे अनेक कंटेनर सरकारने अचानक घेतलेल्या निर्णयाने रस्त्यावर उभे असल्याचे दृश्य आपण पहिले आहे. राजे-महाराजे जेवढे लहरी निर्णय घेत नव्हते तेवढे लहरी निर्णय शेतीमालाच्या व्यापाराबाबतीत आताचे राज्यकर्ते घेऊ लागले आहेत. हे फक्त एखाद्या पिकाबद्दल होते असे नाही. कापूस निर्यातीचाही असाच गोंधळ घालून कापूस उत्पादकाचे अतोनात नुकसान केलेच आहे. तांदूळ आणि साखरेबद्दल वेगळी परिस्थिती नाही. भरून न येणारे नुकसान करून झाल्यावर १३ दिवसांनंतर निर्यातबंदीचा आदेश मागे घेताना निर्यात भावाची नवी अट टाकून सरकारने नवाच गोंधळ निर्माण केला आहे. जे सरकार स्वतः घोषीत केलेल्या हमीभावाच्या खाली शेतमालाची खरेदी-विक्री होणार नाही यासाठी इतक्या वर्षांत काही करू शकले नाही, ते सरकार आता निर्यातमूल्य ठरवू लागले आहे! देशात ज्यांना निर्धारित मूल्ये देता आली नाहीत ते आता आंतरराष्ट्रीय बाजारात शेतकऱ्याची फसवणूक होणार नाही याची काळजी घेणार आहे; पण सरकारला अचानक शेतकऱ्यांबद्दल जे प्रेम वाटू लागले ते खरे आहे की पुतना मावशीचे प्रेम आहे हे तपासले पाहिजे. सरकारने कांद्याचे निर्यात मूल्य निर्धारित केले याचे तीन अर्थ संभवतात. एक, आंतरराष्ट्रीय बाजारात कांद्याच्या बाबतीत भारताची मक्तेदारी आहे व त्यामुळे आपण मागू ती किंमत मिळेल. दोन, आंतरराष्ट्रीय व्यापाराबद्दलचे अज्ञान आणि तीन, निर्यातबंदी उठविल्यानंतरही निर्यात होऊ नये यासाठी खेळलेली धूर्त खेळी. कांदा व्यापारात आपला एकाधिकार नाही हे सर्व जाणतात. सरकारला आंतरराष्ट्रीय व्यापार कसा चालतो हे कळत नाही असे म्हणणे धाडसाचे ठरेल. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत उतरायचे आणि टिकायचे असेल तर आपल्या मालाच्या किमती नेहमीच स्पर्धात्मक व बाजारातील परिस्थिती पाहून ठरवाव्या लागतात. आधी निर्धारित करून ठेवलेल्या किमतींना काही अर्थ नसतो. याचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. सरकारला निर्यातबंदी न लादताही कांद्या निर्यातीत अडथळे आणायचे आहेत. किफायतशीर निर्यात मूल्य ठरविण्याचे पुतनामावशी प्रेम दाखविण्यामागे हे खरे कारण असले पाहिजे. आपल्या घोषीत निर्यात मूल्याच्या थोडे कमी दर ठेवून कांद्याच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातून भारताला हद्दपार करणे आपल्या परंपरागत शत्रुंना-चीन आणि पाकिस्तानला - सहज शक्य होईल.

मुळात शेतकरी स्वतः निर्यात बाजारपेठेत उतरत नाही; पण शेतीमालाची निर्यात होत असेल तर त्याला देशांतर्गत बाजार पेठेत चांगला भाव मिळतो. त्यामुळे त्याचा उत्पादन खर्च जाऊन चार पैसे पदरी पडावेत हाच त्याचा निर्यातीच्या आग्रहामागचा हेतू असतो. निर्यात केल्यानंतर मिळणारा भाव देण्याची व्यवस्था सरकारने केली तर निर्यात करण्याच्या- न करण्याच्या वादात उतरण्याचे त्याला कारणच पडणार नाही. तेव्हा निर्यातमूल्य ठरविण्याची बनवेगिरी करण्यापेक्षा सरकारने हमी भाव कमी ठेवण्याची चालविलेली ठगी बंद करणे जास्त गरजेचे आहे.

### राजकीय शक्तीला पर्याय नाही

कांद्याचा प्रश्न सर्वच शेतकऱ्यांना बरेच काही शिकविणारा प्रश्न आहे. आजच्या परिस्थितीतून पुढे जायचे कसे याचे दिशादर्शन घडविणारा हा प्रश्न असल्याने उत्पादकाची संख्या व उत्पादनक्षेत्र कमी असले तरी फरक पडत नाही. सरकार पाडण्याइतके सामर्थ्य या नासुकल्या कांद्यात असल्याचे देशाने अनुभवले आहे. म्हणूनच कांद्याची भाववाढ हा राज्यकर्त्यांसाठी चिंतेचा विषय बनला आहे. ज्या ज्या बाबींतून सरकार गडगडू शकते याची जाणीव सरकारला होते तेव्हा सरकार त्या त्या बाबी बाबत विशेष दक्ष राहत असते. त्यांच्या सरकारला धग लागत नसेल तर जनता वणव्यात सापडली तरी त्यांना काहीच फरक पडत नसतो. शेतकऱ्यांनी आजतागायत त्यांच्या खुर्ची खाली कधीच धग लावली नाही आणि म्हणूनच ते शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत कधीच गंभीर नसतात. अण्णा हजारे त्यांना हलवून आणि हादरवून टाकू शकले कारण त्यांच्या आंदोलनाने खुर्ची संकटात आल्याची जाणीव राज्यकर्त्यांना तीव्रतेने झाली. शेतकऱ्यांची अनेक आंदोलने झालीत, मोठमोठी आंदोलने झालीत व आर्थिक यश काही प्रमाणात पदरीही पडले, पण राज्यकर्त्याला आव्हान मिळेल अशी राजकीय ताकद शेतकऱ्याला कधी दाखविता आलीच नाही. कोणाची मागणी नसताना कांद्याचे भाव पाडण्यासाठी सरकारने निर्यात बंदी लादली, कारण सरकारला एका गोष्टीची खात्री आहे, शेतीमालाचे



भाव पडले तरी सरकारला धोका निर्माण होणार नाही, पण भाव वाढले तर मात्र सरकार अडचणीत येईल. शेतकरीविरोधी धोरण सरसकटपणे राबविल्या जाण्यामागचे हे एक महत्त्वाचे कारण आहे. आजपर्यंत कोणत्याच शेतकरी आंदोलनाला निर्विवाद यश प्राप्त झाले नाही कारण ते स्थायी स्वरूपाचा राजकीय दबाव निर्माण करण्यात असफल ठरली आहेत. विपन्नावस्थेतही शेतकऱ्यांत आंदोलन करण्याची ताकद होती आणि आजही आहे; पण शेतकरी म्हणून पाहिजे असलेल्या राजकीय जाणीवेचा अभाव आहे. त्याचमुळे मत देण्याची वेळ येते तेव्हा शेतकरी म्हणून त्याच्या वाट्याला येणारा अन्याय, उपेक्षा व दुय्यमत्व याचा त्याला विसर पडतो. तेव्हा मात्र जात, धर्म, सगेसोयरे आणि नित्याच्या भूलथापांना बळी पडून राजकीय जाणीवेचा बळी दिला जातो. परिणामी सरकारला काय किंवा समाजातील इतर घटकांना शेतकऱ्यांविषयी विचार करण्याची गरजचं नसते. जिथे शेतकरी स्वतःचा व दुसऱ्या शेतकऱ्याचा विचार कारीत नाही तिथे तो इतरांनी करावा ही अपेक्षा ठेवणेच गैर आहे. कांदा उत्पादक १३ दिवस रस्त्यावर होते. या तेरा दिवसांत कांदा पीक न घेणाऱ्या शेतकऱ्यांनी कोठेही त्यांना पाठींबा व्यक्त करणारी कृती केली नाही. दुसरीकडे खा. राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली उसाचे समांतर आंदोलन सुरू होते. दोन्ही आंदोलनाचे एकमेकाशी काही देणे घेणेच नव्हते! या पद्धतीने आंदोलने उभी करून आपापल्या मागण्या रेटल्या तर मागण्यांची पूर्तता होईलही पण समस्या कायम राहील. शेतकऱ्याच्या लुटीची व्यवस्था त्यातून संपत नाही. समाजातील उपेक्षित आणि दुर्लक्षित घटक या स्थानाला धक्का बसत नाही. याची चुणूक अण्णा हजारे यांच्या सिव्हिल सोसायटीच्या नेत्या मेधा पाटकर यांनी दाखवून दिली आहे. शेतकऱ्यांवर अन्याय करणारा, त्याला देशोधडीला लावणारा इंग्रजांनी बनविलेला भूमी अधिग्रहण कायदा बदलणारे विधेयक संसदेत सादर झाले त्यावर मेधा पाटकर यांची प्रतिक्रिया बोलकी आहे. अण्णा हजारेंच्या उपस्थितीत राळेगण सिद्धी येथे सिव्हिल सोसायटीच्या झालेल्या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना सरकारने हे विधेयक संमत करायची अजिबात घाई करू नये असे सरकारला बजावले आहे! या विधेयकाने मोठे बदल होणार असल्याने त्यावर व्यापक विचार विनिमय झाला पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. हा आग्रह चुकीचा नाही. कायद्यातील कोणतेही बदल व्यापक विचार विनिमयानंतरच झाले पाहिजेत. सिव्हिल सोसायटीच्या जनलोकपाल बिलासाठी त्यांना कोणताच विचार विनिमय नको आहे, त्या बिलावर विचार न करता संसदेने शिक्का मारावा आणि हे काम चार दिवसांच्या आत करावे यासाठी ज्यांनी सारा देश डोक्यावर घेतला त्यांना १०० वर्षे आधीचा भूमीअधिग्रहण कायदा बदलण्यासाठी मात्र सावकाश पाऊले टाकली पाहिजेत असे वाटते. शेतकऱ्यांची राजकीय ताकद नसली की त्याची किती आणि कशी उपेक्षा करता येऊ शकते याचे हे उदाहरण आहे. राजकीय ताकद आणि राजकीय पक्ष याच्यात गल्लत करता कामा नये. राजकीय ताकद दाखविण्यासाठी राजकीय चौकट पाहिजेच याची गरज नसते. आंदोलनातून प्रकट होणाऱ्या राजकीय ताकदीत बदल घडवून आणण्याचे मोठे सामर्थ्य असते. असे शेतकरी आंदोलन उभे राहण्याची आज खरी गरज आहे.

**सुधाकर जाधव**

पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८

ssudhakarjadhav@gmail.com

http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■

# प्रक्रिया उद्योग आणि शिक्षणपद्धती

**शेतीमाल प्रक्रिया उद्योगाची उभारणी करण्यासाठी भांडवल आणि कौशल्य या दोन मूलभूत आवश्यक गरजा आहेत. त्या पूर्ण झाल्याशिवाय उद्योग उभा राहू शकत नाही, एवढे साधे सूत्र या मंडळींना कळत नाही कारण या मंडळींच्या सतरा पिढ्यांनी उद्योग कशाला म्हणतात हे नुसते डोळ्यांनी पाहिलेले असते, कानांनी ऐकलेले असते पण; स्वतः उद्योग-व्यापार करण्याचा कधी प्रयत्न केलेलाच नसतो. सर्वच विषयातील ज्ञानप्राप्ती केवळ पुस्तकाचे वाचन केल्याने होत नाही; त्याला अनुभवांची आणि अनुभूतीची जोड लागते, एवढे साधे सूत्रही या मंडळींना अजिबातच न कळल्याने ही मंडळी आपला आवाका न ओळखताच नको तिथे नाक खुपसतात आणि नको त्या प्रांतात नको ते बरळत सुटतात. त्याचे दुष्परिणाम मात्र संबंध शेतीव्यवसायाला भोगावे लागतात.**

शेतीमालाचा उत्पादनखर्च भरून निघेल आणि शेतकऱ्यांना सन्मानाने जीवन जगता येईल असे रास्त भाव मिळाले पाहिजेत, असा जेव्हा जेव्हा विषय निघतो तेव्हा तेव्हा शेतीमालास रास्त भाव मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी शेतमालावर प्रक्रिया करणारे युनिट किंवा उद्योग उभारले पाहिजेत, असा एक युक्तिवादवजा सल्ला दिला जातो. असा सल्ला देणाऱ्याची संख्याही गरजेपेक्षा खूपच जास्त आहे. ज्यांना शेती व्यवसायाचा अजिबात गंध नाही असे तज्ज्ञ, ज्यांना मतांच्या राजकारणाखेरीज अख्ख्या आयुष्यात अन्य काहीच करता आले नाही असे पुढारी, ज्यांना शेतीच्या अर्थकारणातील आईचा 'आ'सुद्धा समजला नाही; पण स्वतःला शेतकऱ्यांचे पाठीराखे म्हणवून घेणारे मंत्री वगैरे हाच एकमेव मुद्दा रेटण्यात हिरीरीने आघाडीवर असतात. मात्र शारीरिक श्रमाच्या नव्हे तर आर्थिक भांडवलाच्या बळावर प्रक्रिया उद्योग उभे राहू शकतात. त्यासाठी शासकीय धोरणे शेतीव्यवसायाला अनुकूल असावी लागतात, वित्तिय संस्थांचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक असावा लागतो, हे त्यांच्या ध्यानीमनीही नसते.

शेतीमाल प्रक्रिया उद्योग उभारणीच्या कामामध्ये शेतकरी समाजाने आजपर्यंतच अनास्थाच दाखविलेली आहे, कारण मुळातच शेती हा पूर्णवेळ व्यवसाय आहे. शेतीमध्ये जशी भांडवली बचत निर्माण होत नाही तसेच अतिरिक्त शिलकी वेळेची बचतही निर्माण होत नाही. शेतीव्यवसाय शेतकऱ्याला पूर्णवेळ गुंतवून ठेवणारा व्यवसाय आहे. शिलकी वेळ नाही, पूर्ण वेळ काबाडकष्टात खर्ची घालवूनही पदरात चार पैशांची बचत उरत नाही, बँका पीक कर्जाव्यतिरिक्त अन्य उद्योग उभारायला गरज पडेल एवढे कर्ज द्यायला तयार नाहीत, अशी संपूर्ण भारतात शेतीची स्थिती असताना ही मंडळी शेतकऱ्यांना शेतमालावर प्रक्रिया करणारे युनिट किंवा उद्योग उभारले पाहिजेत, असा सल्ला कसा काय देऊ शकतात, यांच्या जिभा अशा सैरभैर कशा काय चालू शकतात याचे मला नेहमीच अप्रूप वाटत आलेले आहे. एखाद्याच्या हातपायात बेड्या घालायच्या, डोळ्यावर झापड बांधायचे, कानात बोळे कोंबायचे एवढेच नव्हे तर त्याचा श्वास गुदमरेल अशी पुरेपूर व्यवस्था करून झाली की त्याला धावण्याच्या शर्यतीत भाग घ्यायचा सल्ला देण्याइतका किळसवाणा प्रकार आहे हा.



गंगाधर मुटे

शेतीमाल प्रक्रिया उद्योगाची उभारणी करण्यासाठी भांडवल आणि कौशल्य या दोन मूलभूत आवश्यक गरजा आहेत. त्या पूर्ण झाल्याशिवाय उद्योग उभा राहू शकत नाही, एवढे साधे सूत्र या मंडळींना कळत नाही कारण या मंडळींच्या सतरा पिढ्यांनी उद्योग कशाला म्हणतात हे नुसते डोळ्यांनी पाहिलेले असते, कानांनी ऐकलेले असते पण; स्वतः उद्योग-व्यापार करण्याचा कधी प्रयत्न केलेलाच नसतो. सर्वच विषयातील ज्ञानप्राप्ती केवळ पुस्तकाचे वाचन केल्याने होत नाही; त्याला अनुभवांची आणि अनुभूतीची जोड लागते, एवढे साधे सूत्रही या मंडळींना अजिबातच न कळल्याने ही मंडळी आपला आवाका न ओळखताच नको तिथे नाक खुपसतात आणि नको त्या प्रांतात नको ते बरळत सुटतात. त्याचे दुष्परिणाम मात्र संबंध शेतीव्यवसायाला भोगावे लागतात.

स्वतःला कृषिप्रधान म्हणवणाऱ्या या इंडियनांच्या इंडियात भारतीयाने एखादा प्रक्रिया उद्योग स्थापन करायचा ठरवले तर ती अशक्यप्राय बाब झाली आहे. कारण...

**भांडवल**

काही शेतकऱ्यांना एकत्र येऊन गट, संघ किंवा कंपनी स्थापन करता येऊ शकेल; पण त्यातून भाग भांडवल उभे राहू शकत नाही, कारण सर्वच शेतकरी मुळातच कर्जबाजारी असल्याने त्यांच्याकडे भागभांडवल उभे करण्याइतकेही आर्थिक बळ नसतेच. पुढाऱ्यांकडे चिक्कार पैसा असतो

पण ते एकदा शेतकऱ्यांच्या गटामध्ये घुसले की व्यापाराच्या मूळ उद्देशाचे राजकियीकरण होत जाते आणि व्यवहारी दृष्टिकोनाची जागा सहकारी खावटेगिरीने घेतल्यामुळे पदाधिकारी व संचालक मंडळाचा इंडिया होतो आणि वर्षातून एकदा आमसभेत चहापाणी, नाश्ता किंवा फार तर येथेच्छ भोजन देऊन उर्वरित सभासदांची बोळवण केली जाते. सभासदांच्या नशिबातला भारत जसाच्या तसाच कायम राहतो. ज्याच्या हातात सर्वांत जास्त पैशाची झारी, तोच उरलेल्यांचा पुढारी अशीच आपल्या लोकशाहीला परंपरा लाभली असल्याने सामान्य शेतकऱ्याला संचालक मंडळावर कधीच जाता येत नाही.

पुढाऱ्यांना टाळून काही होतकरू शेतकऱ्यांनी एखादा प्रोजेक्ट उभारायचा म्हटले तर अमर्याद अधिकार लाभलेली लायसन्स-कोटा-परमीटप्रिय नोकरशाही जागोजागी आडवी येते. प्रकल्प उभारायला लागणारी जागा, ना हरकत प्रमाणपत्र, अकृषक प्रमाणपत्र, पाणी, वीज, प्रदूषणमुक्ततेचे प्रमाणपत्र वगैरे कायदेशीर बाजू निपटता-निपटताच सामान्य माणसांची अर्धी हयात खर्ची पडते.

एकदाचे एवढे सर्व जरी मार्गी लागले तरी मग प्रश्न उद्भवतो वित्तपुरवठ्याचा. प्रक्रिया उद्योगाला लागणाऱ्या भांडवलाची रक्कम काही लक्ष रुपयांत किंवा कोटींत असू शकते. भारतातील कोणतीच बँक किंवा वित्तीय संस्था शेतकऱ्याला कर्ज पुरवठा करायला तयार नाहीत, हे समजून घेणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना पीककर्जाच्या नावाखाली काही हजार रुपये रकमेचे कर्ज दिले जाते कारण तसे सरकारी धोरण आहे. शेतकऱ्यांना दिलेल्या पीककर्जाची वारंवार बुडबाकी होऊनही वेळोवेळी थकीत कर्जाची फेररचना करून नव्याने कर्ज दिले जाते. पीककर्ज देण्यामागे शेतकऱ्यांचे भले व्हावे हा उद्देश नसून त्यांना कोणत्याही परिस्थितीत शेती करायला भाग पाडणे, असा शासनाचा उद्देश असतो. शेती करायला पैसे नाहीत म्हणून शेतकरी जर शेती पडीत ठेवायला लागले तर आपण काय खायचे? असा सरळ हिशेब शासन आणि प्रशासनाचा असतो. परिणामतः शासन-प्रशासन खाऊन-पिऊन सुखी असते मात्र शेतकरी पुन्हा नव्याने कर्जाच्या गर्तेत ढकलला जातो.

याचा सरळ सरळ अर्थ असा की, पीककर्जाशिवाय अन्य कुठल्याही कारणासाठी या देशातल्या शेतकऱ्यांना सरसकट कर्जपुरवठा केला जात नाही. गृहकर्ज, आकस्मिक कर्ज, मुलांच्या शिक्षणासाठीचे कर्ज, घरगुती साहित्य खरेदीसाठीचे कर्ज वगैरे जसे बिगर शेतकऱ्यांना मिळतात; तसेच कर्ज मात्र शेतकऱ्यांना नाकारले जाते, ही वस्तुस्थिती आहे. अशा एकंदरीत परिस्थितीत शेतकऱ्यांना एखादा प्रोजेक्ट उभारायला वित्तीय संस्था कर्जपुरवठा करील, असे गृहीत धरणारे स्वप्नांच्या दुनियेत जगत असून ते वास्तविकतेपासून फार लांब आहेत, असे म्हणावेच लागेल.

**कौशल्य**

शिक्षण आणि अनुभवातून कौशल्य प्राप्त होत असते; पण केवळ शिक्षणातून येणाऱ्या कौशल्यालाच कौशल्य मानण्याचा भयंकर महारोग आपल्या व्यवस्थेला जडला आहे. एखादी व्यक्ती एखाद्या क्षेत्रात कितीही पारंगत असली; पण शालेय शिक्षण घेऊन पदवी मिळविली नसेल तर ती व्यक्ती अकुशल कारागीर ठरत असते. प्रमाणपत्राशिवाय कुठलीही मान्यता मिळत नसल्याने अशी कौशल्यनिपूण पारंगत व्यक्ती सुपरवायझरच्या हाताखाली रोजंदारी करण्याखेरीज काहीही करू शकत नाही. वेगवेगळ्या भागात स्थानिक शेतमालाची उपलब्धता आणि त्या भागातील लोकांची रुची लक्षात घेऊन छोटेमोठे प्रक्रिया उद्योग उभारणे सहज शक्य असतानादेखिल केवळ शासकीय धोरणे अनुकूल आणि पूरक नसल्याने सामान्य शेतकऱ्याला काहीही करता येत नाही.

**लघुउद्योग**

नाशवंत मालाचे गरजेपेक्षा जास्त प्रमाणावर उत्पादन आले तर त्या शेतमालाची अक्षरशः माती होते. वांगे, टमाटर व अन्य पालेभाज्या सडून जातात. अशावेळी नाशवंत शेतमालावर प्रक्रिया केली तर शेतकरी आणि ग्राहक दोघांनाही लाभ होऊ शकतो. परदेशात फ्रोजन फूड मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. ती टेक्नॉलॉजीही प्रगत आहे. लगेच फ्रीझ केलेले पदार्थ हे कधी कधी ताज्याहूनही अधिक ताजे असतात. जे तंत्रज्ञान आज परदेशात वापरले जाते तसे तंत्रज्ञान आमचा देश कृषिप्रधान वगैरे असूनही विकसित का करू शकला नाही? मागे बायोडिझेल निर्मितीबद्दल बरीच चर्चा झाली होती. बायोडिझेल निर्मिती हा अत्यंत सोपा आणि अत्यंत कमी भांडवली गुंतवणूक लागणारा प्रक्रिया उद्योग आहे. शेतकऱ्यांच्या घराघरात बायोडिझेलची निर्मिती होऊ शकते, पेट्रोलजन्य पदार्थावर अमाप खर्च होणारे परकीय चलन वाचू शकते. शेतीत जेट्रोपा लागवड करता आली तर शेतीसाठी आणखी एक पीकपर्याय उपलब्ध होऊ शकतो आणि महत्त्वाचे म्हणजे पेट्रोलजन्य पदार्थांच्या किंमती घसरून ग्राहकांचा फायदा होऊ शकतो. धान्यापासून दारू तयार करण्याचे तंत्रज्ञानसुद्धा सोपे आणि बिनखर्ची आहे; परंतु शासन यास मान्यता द्यायला तयार नाही कारण ही प्रक्रिया शेतकऱ्यांच्या घराघरातच होणार असल्याने पुढाऱ्यांना आणि नोकरशाहीला चरण्यासाठी कुरणे निर्माण होण्याची शक्यता नाही म्हणून यात सत्ताधाऱ्यांना अजिबात रस नाही, असे म्हणावे लागते.

शेतीविषयक तंत्रज्ञानामध्ये लहान-लहान देश पुढे-पुढे जात असताना आमचा भल्ला मोठा देश मागे-मागे का पडतो? याचेही उत्तर शोधण्याची गरज आहे. स्टोरेज आणि फ्रोजन/पॅकेज्ड फूड इंडस्ट्रीज अन्य देशांत स्थापित अवस्थेमध्ये वावरत असताना आम्ही या विषयात अजून पहिले पाऊलसुद्धा नीट टाकायला सुरुवात केलेली नाही.

**शिक्षण**

शेतीविषयक तंत्रज्ञानामध्ये जोरकसपणे पाऊल टाकायचे असेल आणि उच्चतंत्रज्ञान विकसित करून प्रक्रिया युनिट्स उभारायचे असेल तर त्यासाठी स्किल, कौशल्य, व्यवसायज्ञान, अनुभव, आर्थिक पाठबळ आणि मनुष्यबळ लागेल. आमच्या देशाजवळ मनुष्यबळ सोडलं तर बाकी गोष्टींचा प्रचंड दुष्काळ आहे. मनुष्यबळ आहे; पण त्यात बुद्धिबळ कमी आणि बाहूबळ जास्त आहे. जे काही बुद्धिबळ आहे त्यात व्यवहारज्ञान/व्यावसायिक ज्ञान कमी आणि पुस्तकी किंवा कारकुनी ज्ञान जास्त आहे. आमचे बुद्धिबळधारी विचारवंत आणि पुस्तकी ज्ञानधारी तज्ज्ञ मंडळी कारखाने काढायला कधीच पुढाकार घेत नाही. मात्र कारखाना निघणार आहे अशी बातमी ऐकल्याबरोबर नोकरी मिळावी म्हणून रांगा लावायला धावतात. याला आमची शिक्षणपद्धती जबाबदार आहे. आजची शिक्षणप्रणाली म्हणजे कारकून घडवणारे आणि बेरोजगार निर्माण करण्याचे कारखाने ठरले आहेत. शाळा कॉलेज किंवा उच्च शिक्षणाचे मुख्य सूत्र लाथ मारीन तिथे पाणी काढीन असा विद्यार्थ्यांना आत्मविश्वास देईल एवढे ताकदवान असायला हवे पण दुर्दैवाने तेच घडत नाही. या देशावर वसाहतवादी राज्यसत्ता चालविण्यासाठी इंग्रजांना कारकुनांची गरज होती त्यानुरूप कारकून तयार करणारी शिक्षणप्रणाली त्यांनी स्थापित केली. आम्ही इंग्रजांना घालवले पण



त्यांची शिक्षणपद्धती आजतागायत कवटाळून बसलोच आहोत.

शाळा कॉलेज शिकताना विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षण व्यवस्था या सर्वांचे मिळून अंतिम ध्येय काय असते? तर विद्यार्थ्याने शिकून सवरून या देशाच्या प्रशासन व्यवस्थेचा एक हिस्सा होणे. अगदी कलेक्टरपासून चपराश्यापर्यंत कोणतीही नोकरी मिळाली तरी चालेल पण सरकारी कारकून व्हायचंय सर्वांना. नोकरी मिळवून सहाव्या-सातव्या-आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार पगार उचलून स्वर्गमय जीवन जगायचे आहे सर्वांना. आहे याच आयुष्यात स्वर्गासारखे जीवन जगायला मिळाले तर मरणानंतर नरकवास मिळाला तरी चालेल पण भ्रष्टाचार घाऊकपणे करायचाच आहे सर्वांना. पण मुख्य प्रश्न हा की ३ टक्के नोकरीच्या जागा असताना १०० टक्के विद्यार्थ्यांना आम्ही एकाच मार्गाने ढकलत आहोत? किमान  टक्के विद्यार्थ्यांना तरी व्यावसायिक शिक्षण द्यायला काय हरकत आहे? याचे उत्तर कोणीच देत नाहीत.

डिग्री घेऊन १०० पदवीधर विद्यापीठाबाहेर आलेत की त्यापैकी ३ पदवीधरांना नोकरी मिळते, ते मार्गी लागतात. उरलेले  ९७ पदवीधर नोकरीच्या शोधात भटकत फिरतात. कारण १५-२० वर्षे शाळा कॉलेजात घालवूनही व्यवसाय, स्वयंरोजगार वा अन्य उद्योग करण्यासाठी लागणारे कौशल्य, व्यावसायिक ज्ञान आणि मुख्य म्हणजे आत्मविश्वास यापैकी त्याच्याकडे काहीही आलेले नसते. उद्योग व्यवसाय करायचे म्हटले तर बँका कर्ज देत नाही कारण बँकेला माहीत असते हा शंभराचे साठच करणार. स्वतः डुबणार आणि सोबत बँकेलाही घेऊन डुबणार. म्हणून बँका टाळाटाळ करतात. जसे शेतकऱ्याला प्रक्रिया उद्योगासाठी कर्ज देत नाकारले जाते तसेच बेरोजगारांनाही बँका कर्ज देण्यास अनुत्सुक असतात. कारण पदवी मिळवल्याने व्यवसायज्ञान मिळाले हे बँकेलाही मान्य नसते.

शेवटी एक दिवस घरात खायचे वांदे पडायला लागलेत किंवा लग्नाचे वय घसरायला लागले, की मग मिळेल तो रोजगार करण्याशिवाय त्या बेरोजगारासमोर गत्यंतर नसते आणि मग अशा तऱ्हेने आमच्या तरुणाईचे खच्चीकरण होते. त्यासोबतच प्रक्रियाउद्योग मोठ्या प्रमाणावर काढण्याच्या कल्पना मग केवळ वल्गना सिद्ध व्हायला लागतात.

**कौशल्य आणि राजा हरिश्चंद्र**

यासंदर्भात राजा हरिश्चंद्राचे उदाहरण फारच बोलके आहे. विश्वामित्री कारस्थानात राज्य गेल्यानंतर पोटाची खळगी भरण्यासाठी काहीतरी कामधंदा करावा म्हणून राजा हरिश्चंद्र मजुरांच्या बाजारात जाऊन उभा राहिला. तुला काम काय करता येते? या प्रश्नावर हरिश्चंद्राचे उत्तर होते. मला राज्य चालविता येते; पण ज्यांना काम करण्यासाठी मजूर हवे होते त्यांच्याकडे राज्य कुठे होते, याला चालवायला द्यायला? राजा हरिश्चंद्रास कामच मिळेना. शेवटी स्मशानात राहून प्रेताची रखवाली करण्याखेरीज राजा हरिश्चंद्राला दुसरे कामच मिळाले नाही.

राज्य चालविण्याखेरीज इतर कसलेच कौशल्य नसलेला राजा हरिश्चंद्र आणि प्रशासन चालविण्या खेरीज अन्य कसलेच कौशल्य अवगत नसलेला पदवीधर यांच्यात फरक काय उरतो?

कदाचित आज जर विश्वामित्र पुन्हा एकदा भूलोकात अवतरला आणि शासकीय व प्रशासकीय मंडळींच्या स्वप्नात जाऊन त्याने त्यांची पदे व नोकऱ्या दानात मागून घेतल्या तर अंगभूत कौशल्याच्या बळावर जगताना या तमाम पुस्तकी ज्ञानाच्या महामेरूंची गत अत्यंत दयनीय होईल. राजा हरिश्चंद्राला स्मशानात जाऊन प्रेताची राखण तरी करता आली; पण आधुनिक काळातील राजे हरिश्चंद्र कायम पोलिसांच्या बंदोबस्तात फिरत असल्याने त्यांना केवळ स्मशानाचे नाव ऐकवले तरी भीतीपोटी भूताच्या भयाने अर्धमेले होतील. ही मंडळी भीक मागूनसुद्धा जगू शकणार नाहीत, कारण शेवटी भीक मागायलाही कौशल्य आणि अनुभव लागतोच लागतो.

हे सगळे बदलायचे असेल तर आहे त्या शिक्षणव्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल करावे लागतील आणि या बदलासाठी प्रचंड इच्छाशक्ती लागेल... वरना कुछ नही बदलनेवाला... असंभव...!

**गंगाधर मुटे**

आर्वी छोटी - ४४२३०७, तह. हिंगणघाट, जि. वर्धा.

gangadharmute@gmail.com

www.baliraja.com, मो. ९७३०५८२००४

■■

# फिरुनी गोळा करेन ज्ञान

**[ माझ्या परमप्रिय वाचकरूपी भक्तांनो, आजचे आमचे काल्याचे कीर्तन समजावे, कारण गेल्या वर्षीच्या आक्टोबर महिन्यापासून आम्ही तुमच्यासमोर दर पंधरा दिवसाला एक नवे कीर्तन घेऊन भेटीस येत असू. या सगळ्या कीर्तनमालेला संपूर्ण वर्षभर तुम्ही प्रेमाने वाचनातून ऐकून घेतले, याचा आम्हाला आनंदच आहे. खरे पाहिले तर एका वर्षाच्या भेटीगाठीनंतर आपली रजा घेताना आमचे अंत:करण तसे जड झालेले आहे; पण सर्वांत जास्त आनंद याचा आहे की, आजही आम्ही तुम्हाला 'आपल्यातच' मोठेपण आहे याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न करू शकलो म्हणून! ]**

माझ्या परमप्रिय वाचकरूपी भक्तांनो, आजचे आमचे काल्याचे कीर्तन समजावे, कारण गेल्या वर्षीच्या आक्टोबर महिन्यापासून आम्ही तुमच्यासमोर दर पंधरा दिवसाला एक नवे कीर्तन घेऊन भेटीस येत असू. या सगळ्या कीर्तनमालेला संपूर्ण वर्षभर तुम्ही प्रेमाने वाचनातून ऐकून घेतले, याचा आम्हाला आनंदच आहे. खरे पाहिले तर एका वर्षाच्या भेटीगाठीनंतर आपली रजा घेताना आमचे अंत:करण तसे जड झालेले आहे; पण सर्वांत जास्त आनंद याचा आहे की, आजही आम्ही तुम्हाला 'आपल्यातच' मोठेपण आहे याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न करू शकलो म्हणून! खरे पाहिले तर हा एक योगायोग आहे की, आमचे परममित्र आणि परमभक्त राजमान्य राजश्री श्रीकांत उमरीकर यांच्या ज्ञानात भर टाकावी म्हणून आम्ही स्वत:हून त्यांच्या भूमीगत असलेल्या कार्यालयात जेव्हा गेल्यावर्षी गेलो होतो आणि आमची मोफत व्याख्यानमाला त्यांना ऐकवली, तेव्हा ते नम्र होऊन आम्हाला म्हणाले की, महाराज आपल्या येण्याने जसा आम्हाला त्रासरूपी परमसंतोष झाला आहे, तसा तुम्ही आयुष्यभर इतरांना बोलून-बोलून देत असाल तर त्यापेक्षा एक करा की, आपले उदात्त विचार आमच्याकडे लिखित स्वरूपात द्या, योग्य वाटले आणि समाज बिघडणार नसेल तर आम्ही प्राणाची बाजी लावून ते छापू! आम्ही रा. रा. उमरीकर यांची विनवणी मान्य केली, कारण आम्हाला असलेल्या भीतीपोटी दुसरा मार्गही नव्हता. आम्हाला आजवर आमच्या या भक्तरूपी संपादकाची भीती यासाठी वाटते की, मुळात ही व्यक्ती अभियंता आहे. चांगले गुण प्राप्त करून तेव्हा अभियांत्रिकी महाविद्यालयात शिकलेली आहे. यथावकाश सुदृढ पगाराची नोकरी मिळण्याची शक्यता असूनही 'किक' बसल्याप्रमाणे (इथे कि. क. म्हणजे किरक्या कंड, जो शब्द आमच्या देगलूर ग्रामी बोलल्या जातो.) हे एवढेच कमी की काय स्वत:मध्ये अंगभूत चांगल्याला चांगलं आणि वाईटाला वाईट आहे, असे म्हणण्याचे धाडसही राखून ठेवणारी ही व्यक्ती आहे. बरे, यांचे कार्यालय अंडरग्राऊंड असल्याने यांचे संबंध अंडरवर्ल्डशी असल्याची भीतीही आम्हाला आहे. (अंडरवर्ल्डचे नाते शेतीमाल उत्पादन या अर्थाने पाहिले तर भुईमुग, बटाटा, रताळे, कुपनलिका म्हणजेच उपासाचे सर्व काही पदार्थ अंडरवर्ल्डमध्ये तयार होतात आणि खाऊन खाऊन अजीर्ण झालेल्या पोटाला उपवासाशिवाय पर्याय नसतो. साहित्यातही असेच आहे. काहीही लिहिण्याचे आणि ते छापून यावे म्हणून हावरटपणा करणाऱ्यांना जेव्हा शब्दांचे अजीर्ण होते तेव्हा त्याचे लिखाण श्रीकांतरावांना दाखवले की, ते या शब्दांचे अजीर्ण जावे म्हणून त्याला दहा वेळेस शुद्धलिखाण लिहायला लावतात अशीही अफवा आहे.) या भीतीपोटीच आम्ही आमचे कीर्तन आमच्या भक्त आज्ञेने तुमच्यापर्यंत लिखित रूपात आणले. तुम्हाला उसंतवाणी आवडली होती की नाही हे पाहण्यासाठी आजतरी आमच्याजवळ काही मार्ग नाही; परंतु यावेळी आम्ही आमचा भ्रमणध्वनी क्रमांक श्रीकांतरावांकडे देत आहोत. त्यांनी जर या कीर्तनानंतर छापला तर आवर्जून अभिप्राय कळवा. तुम्हाला धुऱ्याची, धुऱ्यावरच्या बाभळीची शपथ आहे. खरे पाहिले तर आजही निसर्ग आपल्या नियमानुसारच वागतो आहे. निर्जीवांचे तेच गुणधर्म आहेत. सजिवांचेही सृष्टीचक्राप्रमाणे जगणे आहे. हे सगळे एकीकडे आहे मात्र ब्रह्मदेवाने बुद्धी दिलेल्या या सजिवातील एक प्रजाती अर्थात मानवजातीचे सारेच बिघडले आहे. या प्रजातीची मूळं जात वास्तवाने आपण शेतकरीच आहोत. अन्न, वस्त्र, निवारा या तिनही गरजा आपण उगीचच पुरवतो, असे वाटून जाते. असे वाटले की, दु:ख होते. ही बिघडलेली मानवजात ताळ्यावर येईलच यात शंका नाही, कारण आम्हीही ईश्वराला हे मागणे मागितले आहे की,

हेची दान देगा देवा...
माझा बळी सुखी ठेवा...

हे मागण्यामागे आम्हाला जो दृष्टांत झाला आहे त्यात हे कळाले आहे की, मानवाने कितीही सुखकल्पना करून प्रतिसृष्टी रचण्याचा प्रयत्न केला तरी सारे काही वृथा आहे. कारण पंचमहाभूतांपैकी एक महाभूत थोडेसे जरी कोपले तरी होत्याचे नव्हते होऊन जाते. आज भूगर्भातील खनिजतेल संपण्याचा



**शे.भ.प.** शेती भक्त परायण)
**-'थंडा' महाराज देगलूरकर**

पान २६ पाहा



## मुन्शी प्रेमचंद

**अनुवादक - अनंत उमरीकर**

भाग पंधरा

# गोदान

रायसाहेबांनी यावेळी होरीची बाजू उचलली. ''अस्स म्हणजे तुम्ही आणि तुमच्या लुच्चा पंचांनी मिळून एका चांगल्या आसामीचं घर बरबाद करून टाकलंत म्हणायचं. माझ्याच प्रांतात मला विचारल्याशिवाय माझ्याच रयतेकडून पैसा वसूल करायचा तुम्हाला काय अधिकार आहे? मी ठरवलं तर तुम्हाला आणि तुमच्या त्या लुच्च्या पटवाऱ्याला सात वर्षे खडी फोडायला पाठवू शकतो. तुम्ही स्वतःला या प्रांताचे बादशहा समजता, की काय? आज संध्याकाळपर्यंत दंडाची पूर्ण रक्कम माझ्यापर्यंत आली पाहिजे. नसता वाईट परिणाम होईल आणि एकेकाला सात सात वर्षांसाठी खडी फोडायला जावं लागेल. आता जा आणि होरी आणि त्याच्या मुलाला पाठवून द्या.''

भीत भीत हलक्या आवाजात नोखेराम म्हणाला, ''त्याचा मुलगा तर रात्रीच पळून गेला. ज्या रात्री हा सारा प्रकार घडला त्याच रात्री.''

''खोटं बोलू नकोस. खोट्याचा मला फार राग आहे. कुणी प्रियकर आपल्या प्रेयसीला आणून सोडील आणि नंतर पळून जाईल असं तर यापूर्वी कधी घडलं नाही. त्याला पळूनच जायचं होतं तर त्यानं तिला घरी आणून सोडलंच कशाला? तुम्ही लोकांनीच काहीतरी आगाउ पणा केला असावा. तुम्ही गंगेचं पाणी हातात धरून जरी सांगितलं तरी ते मी ऐकणार नाही. तुम्ही लोकांनी त्याला धमक्या देऊन पळून जायला भाग पाडलं असेल!''

नोखेरामजवळ याचं काहीच उत्तर नव्हतं. त्यांचं म्हणणं नाही तरी ठिकंच होतं. तुम्ही स्वतः येऊन खरं खोटं समजून द्या एवढं त्यांना सांगायची नोखेरामची हिंमत नव्हती. मोठ्या माणसांच्या रागापुढे सपशेल शरणागतीच पत्करली पाहिजे. त्यांच्या मताविरुद्ध काहीही ऐकायची त्यांची तयारी नसते.

रायसाहेबांचा हा निर्णय पंचांच्या कानावर गेला. तेव्हा ते पुरते भानावर आले. धान्य जसच्या तसं पडून होतं; पण पैशाची तर वाट लागली होती. राहता राहिलं होरीनं गहाण



ठेवलेलं घर; पण खेड्यातल्या घराला विचारतंय कोण? एखादी हिंदू स्त्री नवऱ्यासोबत असली, की ती स्वामिनी असते; पण त्यानं एकदा का टाकून दिलं, की तिचं पायपुसणं होतं. तसंच होरीचं घर लाख मोलाचं; पण विकायला निघालं, की किंमत शून्य! तिकडे रायसाहेब तर पैशासाठी अडलेले. त्यांना वाटत होतं होरी जाऊन गऱ्हाणं गाऊन आला असेल. सर्वांत जास्त भयभीत झाले होते ते पटेश्वरी लाला. त्यांना तर नोकरीच जायची भीती वाटत होती. चारही पंच या पेचातून कसं सुटाव याचा विचार करत होते; पण त्यांचं डोकं काम करत नव्हतं. एकमेकावर दोषारोप करत आपसात ते खूप भांडले.

मान हलवत पटेश्वरी म्हणाला, ''मी तर आधीपासूनंच म्हणत होतो, की या प्रकरणात गप्प राहिलेलंच बरं. गायीच्या प्रश्नावर तर आपण गप्पच राहिलोत. मात्र या प्रकरणात एवढ्यावरंच भागणार नाही. माझी तर नोकरीच जाईल; पण तुम्हा लोकांचा डोळा तर पैशावर होता. आता काढा वीस वीस रुपये. रायसाहेबांनी रिपोर्ट केला तर जेलची हवा खावी लागेल.''

दातादीन म्हणाले, ''माझ्याजवळ तर वीस पैसे सुद्धा नाहीत. ब्राह्मणांना जेवण दिलं, होमहवन झालं त्यात सारा खर्च झाला. मला जेलात पाठवायची रायसाहेबांची हिंमतंच नाही. ब्रह्मदेव बनून मी तर त्यांना घरच्या घरीच नष्ट करीन. आतापर्यंत त्यांनी कुणा ब्राह्मणाचं तेज अनुभवलं नसेल.''

झिंगुरी सिंगही काहीसं असंच म्हणाला. तो काही रायसाहेबांचा नोकर नाही. त्यानं काही होरीला मारहाणही केली नाही, दबावही नाही टाकला. होरीलाच प्रायश्चित करायचं होतं म्हणून आम्ही त्याला संधी दिली. यासाठी कुणी या लोकावर गुन्हा नाही दाखल करू शकत. ते सारं ठीक होतं; पण नोखेरामची एवढ्यावर सुटका होणार नव्हती. इथं मस्त मजेत होते ते. पगार फक्त दहाच रुपये होता; पण हजारापेक्षा जास्त वर कमाई होती. शेकडो माणसावर सत्ता गाजवता यायची. शिवाय चार पाच माणसं हाताखाली वेठ बिगार म्हणून मिळायचे. एवढंच नाही तर ठाणेदार सुद्धा तो आला म्हणजे त्याला खुर्ची द्यायचा. म्हणून तर मस्त मजेत होता तो. पटेश्वर तर नोकरीत होता आणि त्या बळावर तर त्याची सावकारीही होती. हे सारं सोडून जाणर तरी कुठे? दोन तीन दिवस याच चिंतेत गेले आणि त्यांना अचानक एक मार्ग सुचला. त्यांनी कधी तरी अधून मधून बिजली हा पेपर पाहिला होता. त्यांना वाटलं आपण संपादकांना एखादं निनावी पत्र पाठवलं तर रायसाहेबांची पोल खुलेल. या कल्पनेशी नोखेरामही सहमत झाला. दोघांनी मिळून एक पत्र कसं बसं एक पत्र लिहिलं आणि रजिस्टरी पोस्टानं पाठवलं. त्याचा काय परिणाम व्हायचा असेल तो होतो.

इकडे गावात मात्र बातमी पसरली, की रायसाहेबांनी पंचांना बोलावून आडव घेतलं आणि पंचांनी जी लूट केली होती तेवढी वसूल केली. या लोकांना तर ते जेलातंच पाठवणार होते; पण हे लोक हातापाया पडले थुंकी चाटली तेव्हा कुठे त्यांनी माफ केलं. अशीही गावात चर्चा होती. ते सारं ऐकून धनियाचं काळीज शांत झालं. गावात फिर फिरून तीन पंचांची बदनामी केली. ''माणूस गबिचं गाऱ्हाणं ऐको वा न ऐको, देव जरूर ऐकतो. लोकांना वाटलं होतं पंच लोक दंड वसूल करून गुलगुले खात असतील. ते तर राहिलं बाजूला एका ऐवजी दुप्पट त्रास सहन करावा लागला. आता चाटा म्हणावं माझ्या घराला!''

ते सगळं झालं; पण बैलाशिवाय शेती कशी व्हावी? गावात पेरणी सुरू झाली. कार्तिकात शेतकऱ्याचे बैल मरण म्हणजे शेतकऱ्याचे हातपाय कापल्या जाणे. होरीचे तर दोनही हात कापल्या गेले होते आणि दुसरीकडे गावात पाहवं तो सर्वांच्या शेतात पेरणी चाललेली. होरीची शेती कुणा अनाथ स्त्रीच्या घराप्रमाणे सुनी सुनी झालेली. पुनिया आणि शोभा दोघाकडे बैल जोड्या होत्या; पण त्यांना त्यांच्याच शेतात पेरणी पायी होरीची आठवणकशी व्हावी? होरी दिवसभर भणभण भटकत होता. कधी याच्या तर कधी त्याच्या शेतात. यातून थोडं बहूत धान्य त्याला मिळत होतं खरं. धनिया, रूपा, सोना याही लोकांच्या शेतात पेरणीवर जात होत्या. पेरणीचा हंगाम होता तो पावेतो पोटाला मिळण्याची पंचाईत नव्हती. मानसिक वेदना तर होत होत्या; पण खयला प्यायला मिळत होतं हेही समाधान म्हणायचं. रात्री मात्र घरच्या स्त्री पुरुषात अनबन व्हायची हे मात्र खरं! कार्तिकाचा महिना सरला तसं गावात कामही मिळेनासं झालं. अपेक्षांचा सारा भार आता उसावरंच होता.

रात्रीची वेळ खूप थंडी पडलेली. होरीच्या घरात तर अन्नाचा कणही नव्हता. सकाळी भाजलेल्या मटारवर कसंबसं भागलं; पण आता तर तेही नव्हतं. रूपा तर भुकेनं व्याकुळ झाली होती, दारात बसून रडत होती. घरात काही नव्हतंच तर ती मागणार कशी नी कुणाला? भूक सहन होईनाच तेव्हा ती गेली विस्तू आणायचं निमित्त करून पुनियाच्या घरी. त्यावेळी पुनिया बाजरीची भाकर करत होती आणि भाजी शिजवत होती. ते पाहून रूपाच्या तोंडाला पाणी सुटलं. पुनियानं विचारलं, ''तुझ्या घरी आणखी चूल पेटली नाही का गं?''

''आज तर घरात काहीच नाही. चूल पेटणार कशी?''

''तर मग विस्तू कशाला पाहिजे?''

''दादाला तंबाखू ओढायची आहे.'' पुनियानं एक जळती गोवरी तिच्या पुढे टाकली; पण ती न उचलता रूपा म्हणाली, ''तुझ्या भाकरीचा खमंग वास सुटलाय. मला बाजरीची भाकरी फार आवडते.''

पुनियानं हसून विचारलं, ''खाणार आहेस का?''

''आई रागावेल.''

''पण आईला सांगणार कोण?''

पोटभर भाकर खाऊन खरकट्या तोंडानं ती घरी गेली. होरी निराश मनानं बसला होता. दातादीननं त्याला हाक मारली. आता काय नवीन संकट आलं या कल्पनेनं होरीच्या छातीत धडधड करायला लागलं. तरी त्यानं बाहेर येऊन त्यांना नमस्कार केला, शेकोटी समोर बसायला बाज टाकली. बाजेवर बसता बसता दातादीन म्हणाले, ''तुझं शेत तर पडिकंच राहिलं होरी; पण तू गावात कुणाला काही नाही बोललास. नसता तुझे बैल नेण्याची भोलाची मजाल नव्हती. त्याची तर तिथेच लाश पडली असती. तुला दंड करा असं तर मी म्हणालोच नव्हतो हे तर मी हातात जानव धरून म्हणतो होरी. धनिया विनाकारण माझी गावभर बदनामी करत फिरते आहे. हे सारा लाला पटेश्वरी आणि झिंगुरी सिंगचं कारस्थान आहे. मी तर केवळ लोकांच्या म्हणण्यावर पंचायतवर बसलो. ते लोक तर आणखी कडक दंड लावायचं म्हणत होते. उलट मीच बोलून दंड कमी करायला लावला; पण आता मात्र सारेजणच पश्चात्ताप करायला लागलेत. आधी त्यांना वाटत होतं, की गावात त्यांचंच राज्य आहे; पण गावचा राजा कुणी वेगळाच आहे हे तर ते विसरून गेले होते; पण आता तू पेरणीसाठी काय करणार आहेस?''

''काय सांगू महाराज, शेत आता खालीच ठेवावं लागणार!''

''अरे मग तर केवढा अनर्थ होणार?''

''देवाच्या इच्छेपुढे आपलं काय चालणार?''

''अरे, मी असताना तुझं शेत पडिक राहिल कसं? उद्या मी तुझी पेरणी

करून देतो. शेतात आणखी ओल आहे. उगवणं फक्त दहा दिवस उशीरा होईल एवढंच. तुझी माझी अधीली असेल. यात तुझं नुकसान न माझं! आज मी विचार करत होतो, तुझं चांगल्या वहितीखालचं शेत असं खाली राहणार म्हणल्यावर मला वाईट वाटलं.''

होरी विचारात पडला. चार महिने त्यानं शेतात खात टाकला. औत चालवले, जमीन तयार केली आणि आज केवळ पेरणीच्या बळावर अर्धा हिस्सा द्यायचा म्हणजे काय? त्यात परत आपल्यावर उपकार करत असल्याची भावना. मग यापेक्षा शेत खाली राहिलं तर काय वाईट? पण यावेळी आपण बे-बाक नाही झालो तर बे-दखल व्हावं लागेल. त्यानं प्रस्ताव स्वीकारला.

खुश होऊन दातादीन म्हणाले, ''मग लगेच बी मोजून देतो. सकाळी वाट पहावी लागणार नाही. बरं तू जेवण तर केलंस ना?''

मान खाली घालून होरी म्हणाला, ''नाही आज चूल पेटली नाही.''

नकली प्रेम दाखवत दातादीन म्हणाले, ''तुझ्या घरात चूल नाही पेटली आणि तू मला सांगितलंही नाहीस. अरे आपण शत्रू आहोत, की काय? एवढ्यासाठी तू अनमान करू लागलास? भल्या माणसा, यात लाज वाटायचं काय कारण? आपण सगळे एकंच तर आहोत की. सगळ्यांचे सगळेच दिवस चांगले असतातंच असं काही नाही. कुणास ठाऊक उद्या माझ्यावरही वाईट दिवस येतीलही! तेव्हा मी तुझ्यापासून माझं दुःख लपवीन, की काय? चल माझ्यासोबत बीयाबरोबर थोडं धान्यही देतो.''

अर्ध्या तासात होरी मणभर धान्य घेऊन आला आणि घरात चूल पेटली. धनिया रडतही होती आणि रडता रडता जातही ओढत होती. कुठल्या पापाचं प्रायश्चित्त देत होता देव? दुसऱ्या दिवसापासून पेरणी सुरू झाली. होरीचं सारं कुटुंब कामाला लागलं होतं. काही दिवसातंच पाणभरणही झालं. दातादीनला तर फुकआत मजूरही मिळाले. आता कधी कधी त्याचा मुलगाही घरात यायला लागला. मुलगा मातादीन हा, तरुण आणि गोडबोल्या होता. दातादीन जे काही लांडी लबाडी करून कमवायचा ते सारं भांग, गांजा अशा शौकात बुडवायचा. एका चांभारणीच्या प्रेमात पडला म्हणून आणखी बिन लग्नाचा राहिला होता. ती रहायचीही मातादीनच्या जवळच; पण ते सारं दिसत असूनही सारे लोक गप्प बसून होते. आमचा धर्म तसा जेवणाभोवती फिरतो. जेवण पवित्र राहणं आपल्या धर्मासाठी पुरेसं आहे. अन्न ढालबनून आमचं रक्षण करतं.

आता बटईनं शेती करणं चालल्यामुळे त्या लोकाशी बोलण्याची संधी मातादीनला मिळत होती. झुनिया एकटी आहे असं पाहून तो घरात यायचा, काही तरी निमित्त करून. झुनिया काही सुंदर नव्हती; पण तरुण होती आणि त्याच्या चांभारणीपेक्षा निश्चितच चांगली होती. काही दिवस शहरात राहिलेली असल्याने नीट नेटकं राहणं, चांगलं नेसणं तिला कळायचं. शिवाय ती लज्जाशीलही होती. मातादीन तिच्या लेकराला घ्यायचा आणि प्रेमानं खेळवायचा. त्यामुळे ती खुश व्हायची.

एके दिवशी त्यानं तिला विचारलं, ''गोबरमध्ये तू काय पाहिलंस झुना?''

लाजत लाजत मी म्हणाली, ''माझ्या नशीबानं आणलं मला.''

दुःखी आवाजात तो म्हणाला, ''पण तो तर खूपंच अप्रामाणिक निघाला. तुझ्यासारख्या लक्ष्मीला सोडून तो कुठे भटकतो आहे कोण जाणे? चंचल स्वभावाचा माणूस आहे तो, कुठे फसला तर नसेल? अशा माणसाला तर गोळी घालायला पाहिजे. एका माणसाचं आयुष्य खराब करून टाकलं त्यानं.''

यावर ती रडायला लागली तेव्हा त्यानं हलकेच तिचा हात धरला आणि तिला समजावून सांगायला लागला, ''तू त्याची पर्वा का करतेस झुना? तो गेला तर जाऊ दे, तुला काय कमी आहे? रुपये, पैसे, कपडे जे पाहिजे ते माझ्याकडून घे.''

झुनियानं हळूच त्याच्या हातातून आपला हात काढून घेतला आणि म्हणाली, ''तुमच्या अशीर्वादानं सगळं ठीक आहे महाराज. मी तर सगळीकडूनंच कामातून गेली आहे. मला न माय मिळाली न राम! दुनियाला मी ओळखू शकत नव्हते. त्याच्या गोड गोड बोलण्यात फसले मी!''

आता मातादीननं गोबरचे दोश सांगायला सुरुवात केली, ''तो तर निव्वळ लफंगा आहे. जेव्हा पहावं तेव्हा आई बापाशी भांडण. चुकून माकून पैसा हातात पडला, की चालला जुव्वा खेळायला. चरस आणि गांजाचं त्याला व्यसज होतं. गुंडा पुंडा सोबत भटकायचं आणि पोरी सोरींची छेडछाड काढायची हाच त्याचा उद्योग. ठाणेदार त्याला काही प्रकरणात चालानही करणार होते. आम्ही लोकांनी ठाणेदाराची खूप खुशामद करून त्याला वाचलं. दुसऱ्यांच्या खळ्यातून तो धान्य चोरायचा. काहीवेळा मी त्याला पकडलंही होतं; पण आपल्या गावचा म्हणून मी सोडून दिलं.''

यावेळी घरातंच असलेली सोना बाहेर येऊन म्हणाली, ''वहिनी आईनं सांगितलं, की धान्य बाहेर काढून ठेवा. धान्यात ओल फार आहे. भूसा खूप निघेल. धान्यातला ओलसरपणा काढण्यासाठी उन्हात वाळवावं लागेल.'' आपणंच दिलेल्या धान्याबाबतही तक्रार असल्यामुळे समर्थन देण्यासाठी मातादीन म्हणाला, ''तुमच्याकडे पाणी जास्त पडत नाही. आमच्याकडे तर पावसाळ्यात लाकडालाही पाणी सुटतं. धान्याची काय बात?'' असं म्हणत तो बाहेर निघून गेला. सोनानं येऊन त्याचा सारा डाव उधळून लावला होता.

सोनानं तिला विचारलं, ''मातादीन कशाला आला होता गं?''

''पगडी मागायला आला होता. मी म्हणाले आमच्या घरी नाही.''

''हे सगळं निमित्त आहे. वाईट माणूस आहे तो.''

''मला तर चांगला वाटला. काय दुर्गूण आहेत त्याच्यात?''

''तुला ठाऊक नाही. त्यानं सिलीया चांभारणीला ठेवलंय!''

''अगं मग त्यात काय खराब आहे?''

''अन् मग खराब कशाला म्हणायचं?''

''तुझ्या भावानं सुद्धा मला आणलंच की. मग त्याला वाईट म्हणायचं का?''

याचं काही उत्तर न देता सोना म्हणाली, ''पुन्हा आला तर हाकलून देईन.''

''आणि त्याच्याशीच तुझं लग्न झालं तर?''

यावर लाजत ती म्हणाली, ''वहिनी, तू तर शिवी देतीस मला.''

''का, यात शिवी काय झाली?''

''माझ्याशी नुसतं बोलला तो तरी मी त्याला आग लावीन.''

''मग काय, तुझं लग्न कुणा राजकुमाराशी होणार आहे का? गावात असा सुंदर, चांगला चुंगलं राहणारा दुसरा कुणी आहे का?''

''तर मग तूच जा, की त्याच्याबरोबर. सिलीयापेक्षा लाख पटीनं सुंदर आहेस!''

''मी का जाईन? मी तर एका संगे आले. भला असो वा बुरा!''

''मग मी सुद्धा ज्याच्याशी लग्न होईल त्याच्याच संगे जाईन मग तो भला असो वा बुरा!''

''आणि समजा एखाद्या म्हाताऱ्याशी लग्न लागलं तर?''

यावर ती हसत हसतंच म्हणाली, ''मी त्यालासाठी नरम नरम रोट्या बनवीन. त्याच्यासाठी औषध कुटण, गाळण अशी कामं करीन. त्याचा हात धरून उठवत जाईन आणि तो मेल्यावर तोंडावर पदर घेऊन रडत बसेन!''

''आणि एखाद्या तुरुणाशी लग्न लागलं तर?''

''मग डोसका तुझा नाही तर काय?''

''बरं ते जाऊ दे. तुला म्हातारा नवरा पाहिजे, की तरणा?''

''जो आपल्यावर प्रेम करील तो तरुण न करील तो म्हातारा!''

''देव करो अन् तुझं लग्न म्हाताऱ्याशीच होवो, मग पाहते तो तुला कसा आवडतो ते आणि तो बेशरम मेला तर तुरुणाबरोबर कशी राहतेस ते.''

''मला तर तशा म्हाताऱ्याची किव येते.''

त्यावर्षी त्या भागात एक साखर कारखाना निघाला. त्या कारखान्याचे नोकर, व्यवस्थापक गावोगाव फिरून ऊस विकत घ्यायचे. तो कारखाना खन्नानं सुरू केला होता. एके दिवशी त्या कारखान्याचा माणूस या गावातही आला. शेतकऱ्याशी त्यानं भाव वगैरे सुरू केला. तेव्हा लोकांच्या लक्षात आलं गुळ बनवण्यात फायदा नाही. मग गुळ बनवायचा कशाला म्हणून सर्वांनी उसाचा सौदा केला. पैसे थोडे बहूत कमी मिळाले तरी हरकत नाही जे मिळायचं ते लगेच तर मिळतं. कुणाला बैल घ्यायचे होते तर कुणाला बाकी द्यायची होती. आणखी कुणाला सावकाराच्या पाशातून सुटायचं होतं. होरीला बैलजोडी घ्यायची होती. त्याच्या उसाचं पीक समाधानकारक नव्हतं म्हणून माल पडून राहतो, की काय अशी भीती त्याच्या मनात होती. त्याला वाटायचं गुळाच्या भावातंच साखर मिळू लागली तर कुणी गुळ घेईल कशाला? एकूण काय सर्वांनी कारखान्याकडून बयाना घेतला. कमीत कमी शंभर रुपये तरी आपल्याला मिळतील असं होरीला वाटत होतं. एवढ्यात अती साधारण बैलजोडी येऊ शकली असती; पण मग सावकारांच्या कर्जाचं काय करायचं? दातादीन, मंगरू, दुलारी, झिंगुरा सिंग सगळेचजण तर जीव खात होते आणि या सावकारांची देणी द्यावी म्हणलं तर त्यालाच शंभर रुपये पुरणार नव्हते. उसाचे पैसे तर हातात पडावेत; पण कुणाला खबरही लागू नये यासाठी काय करता येईल हाही विचार त्यानं केला; पण तशी काही युक्ती त्याला सुचत नव्हती. एकदा का बैल घरी आले, की मग त्याला काही भीती नव्हती. गाडीत ऊस घातला, की लोकांना आपोआप कळतं, की पैसे मिळणार आहेत. सावकार मंडळी तर टपूनंच असतील, पैसे हातात पडले, की त्यांनी झडप घातलच समजा.

सायंकाळी गिरीधरनं विचारलं, ''काका, तुम्ही ऊस कधी घालणार?''

त्याला कळू नये म्हणून होरी म्हणाला, ''आमचही काही ठरलं नाही.''

सारे शेतकरी अशीच थापाथापी करत होते. कुणाचा कुणावर विश्वासंच नव्हता. सगळेचजण झिंगुरी सिंगचे कर्जदार होते आणि सर्वांना तीच भीती होती, की त्याला कळलं तर आपल्या हातात काहीच पडणार नाही आणि मग त्याच्याकडे कर्जासाठी जावं लागणार? परत नवीन कागद, नवे खर्च, नजराणा इत्यादी इत्यादी.

दुसऱ्या दिवशी शोभा आला आणि म्हणाला, ''दादा, काही असा उपाय करा, की झिंगुरा सिंगला महामारी होऊन तो मरावा. नाही तर असा रपकन पडावा, की त्याला उठताच येऊ नये.''

हसतंच होरी म्हणाला, ''अरे त्याला पोर बाळ नाहीत का?''

''त्याच्या पोराबाळांना पहायचं का आपल्या पोराबाळांना? त्यानं तर दोन दोन केल्या आहेत. त्यांचे संसार आरामात सांभाळतो आहे. आपल्या नशिबात तर भाकरीचा तुकडाही नाही. त्याला कळलं तर सारा पैसा तोच घेऊन जाईल. घरी एक दमडाही नेऊ देणार नाही.''

''अरे माझी अवस्था तर तुझ्यापेक्षाही वाईट आहे. हे पैसे हातातून गेले तर मी तर बरबादंच होईन. बैलाशिवाय कामंच होणार नाही.''

''आता तर ऊस न्यायला सुरुवात होते आहे. जमादाराला सांगावं, की आमचा ऊस झटपट मोजून घे. पैसे मागाहून दे. इकडे आपण झिंगुरीला सांगू पैसे आणखी मिळाले नाहीत.''

काहीक्षण विचार करून होरी म्हणाला, ''झिंगुरी आपल्यापेक्षा कितीतरी पट अधिक हुशार आहे. तो जाऊन सरळ मुनिमाला भेटेल आणि पैसे मागून घेईल. आपण तर पहातंच बसू आणि हे बघ, ज्या खन्नाचा हा कारखाना आहे त्याचीच तर या झिंगुरीमार्फत सावकारी आहे. दोघेही आतून एकंच आहेत.''

निराश होऊन शोभा म्हणाला, ''या सावकाराच्या पाशातून कधी सुटका होईल कोण जाणे?''

''या जन्मात तर काही आशा दिसत नाही.'' होरी म्हणाला. ''आपल्याला श्रीमंती नको, भोग विलास नको. बस फक्त बऱ्यापैकी कपडेलत्ते, खाणंपिणं, राहणं एवढी माफक अपेक्षा आहे; पण तेही मिळत नाही.''

शोभाला एक शक्कल सूचली, ''मी जमादाराला सांगतो, पैशासाठी आम्हाला खूप चकरा मारायला लाव. पाहू तर खरं आपल्याप्रमाणे झिंगुरी किती चकरा मारतो ते!''

हसत हसतंच होरी म्हणाला, ''असं काही जमणार नाही बाबा. त्यापेक्षा झिंगुरी पुढेच हात जोडावेत, पाया पडावं. आपण जाळ्यात पुरते अडकलो आहोत. जेवढी फडफड तेवढे अधिकच जाळ्यात अडकू.''

''दादा, तुम्ही तर एकदम म्हाताऱ्यासारखं बोलायला लागलात. असंच अडकून राहणं हा तर शुद्ध भित्रेपणा आहे. गळ्याचा फार आणखी आवळला जात असेल तर जाऊ द्या; पण जोर तर एकदा लावाला लागणार आहेच. काय होईल? झिंगुरी आपलं घर हराज करील एवढंच ना? करू दे हराज. मी तर म्हणतो आपल्याला कुणीही पैसे देऊ नयेत तर मरू द्यावं उपाशी! लाथा खाऊ द्याव्या. एक पैसाही कुणी उधार देऊ नये. मग त्यांना व्याज मिळणार कुठून? एक सावकार आपल्यावर दावा लावतो तर दुसरा कुणी तरी पैसे कर्जाऊ द्यायला तयार होतो. सुटका करायला आपली झिंगुरी ज्या दिवशी इकडे तिकडे कुठे गेला असेन त्या दिवशी मी पैसे घेईन.''

होरीचं मनही विचलीत झालं. तो म्हणाला, ''हो, हे ठीक आहे.''

''उसाचं माप होऊन जाऊ दे. पैसे त्याला न कळू देता घेईन.''

''बस, बस असंच करूया.''

**क्रमशः**

**- अनंत उमरीकर**

नानल पेठ, परभणी -४३१४०१. मो. ९८९०३९६६५७

■■

पान २१ वरून पुढे

काळ जवळ आला आहे, तर अर्धे जग नैसर्गिक आपत्तीने त्रस्त आहे. अन्न आपण तयार करतो. पोट भरल्यानंतरच कोणताही सुखोपभोग घेता येतो. वाढत्या नागरीकरणामुळे वीजही कमी पडणार आहे, लोकसंख्येमुळे जमीनही सरणार आहे, नियोजनाने शेती जिवंत ठेवली तर या शतकातच घरासमोर म्हणूनच हेलीकॉप्टरसुद्धा येऊ शकणार आहे. हे सगळे आज भ्रामक वाटेल; पण हे एकदा घडणारच आहे. हे नंतर कधीतरी घडेल; परंतु आज योगायोगाने विजयादशमीच्या मुहूर्तावर आमचे आजचे कीर्तन छापून येत असताना दारिद्र्य कल्पना सोडून समृद्धीचे स्वप्न पाहणेच औचित्याचे ठरणार आहे.

आमची उसंतवाणी ही अशी होती, कारण आम्ही संथवृत्तीचे आणि खट्याळ संतप्रवृत्तीचे आहोत. आम्हालाही चारित्र्याचे हँडललॉक आहे. तुम्हीही लावून घ्या. आज आपल्याशी मनोगत व्यक्त करताना आमचे दुसरे परमभक्त चिरंजीव श्रीकांत यांचा उल्लेख करून त्यांना हा आशिर्वाद द्यावा वाटतो की, शेतकऱ्यांचे कळीचे प्रश्न तुझ्या अंगुली सामर्थ्यामुळे आम्ही अचूक शुद्धलेखनासह त्यांच्यासमोर  मांडू शकलो. आमची वाणी आज वाचताना तुम्हाला अचानक प्रश्न पडला असेल, की मध्येच महाराजांनी हा कोणता नवा श्रीकांत कीर्तनात घुसवला. हा श्रीकांत नंबर दोन म्हणजे तुमच्यापर्यंत शेतकरी संघटकचा जो अंक येतो त्याला सर्वांगीणपणे देखणा बनवण्याचे काम करणारा आमचा गुप्त संपादक, मुद्रक, संशोधक असा श्रीकांत झाडे.

आमच्या उसंतवाणीचा समारोप करताना एक अंतिम मुद्दा हा विषद करावा वाटतो की, आम्ही आजवर जे भाष्य केले ते वृत्तीवर केले. आम्ही कोणत्याही व्यक्तीचा द्वेष कधी केला नाही, कारण द्वेष करण्याइतपत कोणी मोठंही आम्हाला सापडलेलं नाही. चला, जेव्हा असंख्य खुजी लोक आजूबाजूला असताना आपण जगत आहोत तेव्हा आपल्या सात्विक उंचीची लाज कशाला बाळगायची? म्हणूनच...

जे जे वाटेल चांगले
ते ते म्हणावे आपले
व्यर्थ काही जे दिसले
झटकून त्याला टाकले

असे म्हणत रोज जगावे आणि आपल्या सावलीलाही सोबतच ठेवावे.

तथास्तू!!

**- शे.भ.प. 'थंडा' महाराज देगलूरकर**

**मु. पो.** thandamaharaj@gmail.com
मो. ९४२१८३९६६९

■■



# शेतकरी संघटनेचा कृषी आयुक्तालयावर प्रचंड मोर्चा

## कापूस, ऊसदर प्रश्नी आंदोलन तीव्र करणार

## तीन हजारांचा दर हवा; कांदा, तांदळावरील निर्यातबंदी उठवण्याची मागणी






**पुणे :** यंदाच्या साखर हंगामात ऊसाला प्रति टनाला तीन हजार रुपये दर द्यावा, अन्यथा कारखान्यांची धुराडी पेटवू देणार नाही. मागणी मान्य न झाल्यास नोव्हेंबर महिन्यात एक लाख शेतकऱ्यांचा मोर्चा काढून आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा राज्य शेतकरी संघटनेचे प्रांताध्यक्ष रवी देवांग यांनी दिला आहे.

राज्य शेतकरी संघटनेच्या वतीने शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी कृषी आयुक्तालयावर मोर्च काढण्यात आला होता. यावेळी स्वतंत्र भारत पक्षाचे वामनराव चटप, ज्येष्ठ नेते गोविंद जोशी, वसंतराव आपटे, महिलाआघाडी प्रमुख उज्ज्वला नरदे, पुणे जिल्हाध्यक्ष आबासाहेब ताकवणे, कैलास तवार, शांतराव जाधव, संतु पाटील झांबरे, कडू अप्पा पाटील, तुकाराम निरगुडे आदी या वेळी उपस्थित होते. मालधक्का चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनापासून मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी आयुक्तालयावर सभा झाली. मोर्चात राज्यातील विविध भागांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. देवांग म्हणाले, ''गेल्या वर्षी उसाला अठराशे रुपये दर जाहीर करूनसुद्धा कारखान्यांनी दर दिलेला नाही अशा कारखान्यांवर कारवाई करावी. तसेच यंदाच्या हंगामासाठी तीन हजार रुपये पहिली उचल देण्यात यावी. अन्यथा, कारखाने सुरू करू दिले जाणार नाहीत. पेट्रोल-डिझेलच्या किमती दिवसेंदिवस वाढत असाताना मात्र शासन इथेनॉलवरील सर्व बंधने हटवीत नाही. बंदी हटविली तर शेतकरी इथेनॉलवर वाहने चालवतील.''

ते म्हणाले, ''राज्यात तांदळाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. मात्र फक्त बासमती तांदूळच निर्यात केला जातो. कोकणातील शेतकऱ्याच्या तांदळाला चांगले दर मिळायचे असतील तर बिगर बासमती तांदळाची निर्यातबंदी उठविली पाहिजे. तसेच कांद्यावरील किमान निर्यात शुल्क इतर देशांच्या तुलनेत ठेवावे. शेतकऱ्याला त्याच्या कष्टाचे मूल्य ठरविता यावे यासाठी बाजार मुक्त करण्यात यावा. गेल्या काही वर्षांत शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या कापूस पिकाच्या पट्ट्यात झाल्या आहेत. गेल्या वर्षी शासनाने सुमारे ५० हजार गाठींची निर्यात केल्याने सहा हजार रुपये दर मिळाला. यंदा शासनाने एक लाख गाठींची निर्यात करावी.''

''सध्या देशात विविध भागांत विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात शेत जमिनी अधिग्रहण करण्यात येत आहे. यामुळे शेतकरी भूमिहीन होण्याचा धोका आहे. हे टाळण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांच्या मर्जीनुसार शेतजमीन अधिग्रहण करावी. केंद्र सरकारने प्रस्तावित केलेल्या नव्या भूसंपादन कायद्याचे पुनर्परीक्षण करावे, देशातील शेतकरी संघटनांशी चर्चा करून आवश्यक ते बदल करावेत,'' अशी मागणी देवांग यांनी केली.

या वेळी विविध मागण्यांचे निवेदन प्रभारी कृषी आयुक्त पांडुरंग वाठारकर यांना देण्यात आले.

# शेतकरी महिला आघाडीचा रौप्य महोत्सवी
# कृषी वीरांगणा गौरव समारंभ




**जयसिंगपूर दि. २५ :** शेतकरी महिला आघाडीच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त संघटनेच्या वतीने, शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी व महिलांच्या हक्कासाठी ज्या लढाऊ भगिनिनी आंदोलनाच्या माध्यमातून संघर्ष केला, पोलिसांच्या लाठीमार सोसला व तुरूंगवासही भोगला अशा शूर महिलांना 'कृषि वीरांगणा गौरव पुरस्कार' प्रदान करण्याचा जल्लोषी कार्यक्रम आज रविवार दि. २५ सप्टेंबर, २०११ इ रोजी सोनाबाई इंगळे सभागृहात साजरा झाला. या कार्यक्रमास शेतकरी संघटनेच्या मा. आमदार सौ. सरोजताई काशीकर ( अखिल भारतीय समन्वय संघटना अध्यक्षा ) या प्रमुख पाहूण्या म्हणून उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्तिका व कवयित्री मा. सौ. निलम माणगांवे होत्या.

सर्व प्रथम जयसिंगपूर शहर अध्यक्षा सौ. विद्या शिंदे यांनी सर्वांचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या संयोजिका पश्चिम महाराष्ट्र महिला विभाग प्रमुख सौ. उज्वला नरदे यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाचा हेतू व प्रयोजन विषद केले.

प्रमुख पाहूण्या मा. सौ. सरोजताई काशीकर यांच्या हस्ते शौर्य व पराक्रम गाजविलेल्या कार्यकर्तीना 'कृषि वीरांगणा गौरव पुरस्कार' देवून त्यांचा सत्कार करणेत आला. एकूण पश्चिम महाराष्ट्रातल्या ३३ कृषी विरांगणांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आघाडीच्या काही महिलांनी आपली मनोगते व्यक्त केली. विशेषतः मराठवाडा वि. प्रमुख सौ. गिता खांडेभराड, परभणीच्या सौ. अंजली पातोरकर, वाईच्या सौ. शैलजा देशमुख, कोल्हापूरच्या जिल्हाध्यक्षा सौ. सावित्री गिरी इत्यादींनी आपले अनुभव व विचार व्यक्त केले.

प्रमुख पाहूण्या मा. आमदार सौ. सरोजताई काशीकर यांनी सर्व सत्कारमुर्तीचे कौतूक करून शेतकरी संघटनेच्या कार्यातील महिला आघाडीच्या योगदानाचा आढावा घेऊन गौरव केला. यावेळी त्यांनी सर्वांना स्फूर्ती व प्रेरणा देणारे विचार मांडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. नीलम माणगांवे यांनी शेतकरी महिलांच्या वास्तव व कष्टमय जीवनांचे चित्रण आपल्या कसदार व शैलीदार भाषणात केले.

या कार्यक्रमास सांगली जिल्ह्याच्या अध्यक्षा सौ. स्वाती पाटील मंगलाताई पाटील सातारा जिल्हा अध्यक्षा सौ. शबाना मुल्ला, परमेश्वर तळेकर, सातारा शकूंडेआप्पा महाराष्ट्र युवा आघाडीचे अध्यक्ष संजयकोले, चंद्रकांत वंजाळे जिल्हा अध्यक्ष शीतल राजोबा, ज्येष्ठ नेते जयपाल फराटे पश्चिम महाराष्ट्रातील महिला व पुरूष कार्यकर्ते तसेच स्थानिक महिला मंडळाच्या सर्व सदस्या, गावातील अनेक मान्यवर महिला व पुरूष मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

सामुदायिक शपथ घेतल्यानंतर पुष्पांजली ग्रुपच्या वतीने बालिकांनी संगीतमय राष्ट्रगीत सादर केले. अल्पोपहार व चहापानानंतर हा कार्यक्रम संपन्न झाला. नीटनेटके संयोजन व नियोजनामुळे कार्यक्रम बहारदार झाला.

## कृषी वीरांगणा सत्कारमूर्ती

१. गंगुबाई कनप, २. सुंदराबाई कुंभार, ३. अलका कनप, ४. कामाबाई कनप, ५. सुमन कुंभार, ६. लता कनप, ७. शालन कनप, ८. सईबाई कनप, ९. जिजाबाई कनप, १०. सरूबाई पोतदार, ११. शानाबाई कनप, १२. सुलाबाई कनप, १३. राजाक्का कनप, १४. हौसा कनप, १५. सुंदराबाई बिरनाळे, १६. सुंनदा गुरव, १७. वासंती बिरनाळे, १८. कुसुम खदीले, १९. सुरेखा बिरनाळे, २०. इंदू कोळी, २१. अंजना पाटील, २२. सिंधु गुरव, २३. सुनिता कोले, २४. सावित्री नलवडे, २५. सुनिता वाडकर, २६. रेखा दळवी, २७. आशाराणी मालगावे, २८. भाग्यश्री कौटेकर, २९. रंजना पाटील, ३०. शब्बाना मुल्ला, ३१. शैलजा देशमुख, ३२. सावित्री गिरी, ३३. शारदाताई कोईंगडे

# शेतकरी संघटनेची केम येथे शेतकरी परिषद

## शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायास आंदोलनाने उत्तर देऊ - मा. संजय कोले

**केम :** आमच्या शेतीमालाला योग्य भाव द्या आणि जर देणार नसाल तर आम्हाला आंदोलन करून मिळवावा लागेल. शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेणार असाल तर आम्ही आंदोलनाने उत्तर देऊ असा इशारा जिल्ह्यातील साखर सम्राटांना शेतकरी संघटनेचे नेते संजय कोले यांनी दिला.

केम, ता. करमाळा, जि. सोलापूर येथे दि. २१ सप्टेंबर ११ रोजी पश्चिम महाराष्ट्र शेतकरी संघटना युवा आघाडीचे अध्यक्ष श्री. परमेश्वर तळेकर यांनी आयोजित केलेल्या मेळाव्यात ते बोलत होते. सदर मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्हा शेतकरी संघटनेचे नेते मा. वसंतराव आपटे होते. प्रास्ताविक भाषणात करमाळा तालुका सचिव श्री. गणेश पवार (वडशिवणे) यांनी करमाळा तालुक्यामध्ये शेतकरी संघटनेची जडणघडण श्री. परमेश्वर तळेकर यांनी कशा पद्धतीने केली याचा सविस्तर वृत्तांत मांडला. सदर मेळाव्याच्या प्रचारार्थ तळेकर यांच्यासोबत ११ दिवसांत तालुक्यातील ९१ गावांत जाऊन जाहीर सभा घेऊन शेतकऱ्यांमध्ये या मेळाव्याची जनजागृती केली होती. शेतकऱ्यांना शासन कशी लुबाडणूक करत आहे याचे वास्तव जनतेसमोर मांडल्यामुळे सदर मेळाव्यास प्रचंड उपस्थिती होती. सुरुवातीस चि. भगवंत गणेश पवार (वय ८) या लहान मुलाने स्वागतपर भाषण केले त्यास उपस्थितांनी चांगलीच दाद दिली. श्री. कोले यांनी भाषणातून विविध विषय मांडले त्यास शेतकऱ्यांनी घोषणा देऊन मंजुरी दिली. सभेत चर्चिली गेलेले विषय पुढीलप्रमाणे :

१) राज्यातील चांगल्या दर देणाऱ्या कारखान्यांप्रमाणे गाळप व तोडणी, वाहतूक खर्च ग्राह्य मानण्यात यावा, इतर कारखान्यांनी तो जादा दाखवल्यास तो संघटनेला मान्य नाही. २) शासनाने साखरेचा बाजारभाव किमान ३००० रु. प्रतिक्विंटल कायम ठेवावा. ३) २०११-१२चा हंगाम चालू होण्याअगोदर २५ लाख टन साखर निर्यात करण्यात यावी. ४) आम्हाला बंदिस्त मार्केट पद्धत मान्य नसून, शेतमालाचा बाजार नियंत्रणातून मुक्त करण्यात यावा. ५) कारखाना बंद असलेल्या कालावधीतील कामगारांचा बंद काळातील पगार शेतकऱ्यांच्या उसाच्या पैशांतून देण्यात येऊ नये. ६) २०११-१२ या हंगामास गळीतास जाणाऱ्या उसास पहिली उचल २१०० रुपये एक रकमी मिळाली पाहिजे. ७) शेतकरी कर्जाचा १ रुपयाही भरणार नाही. शासनाने संपूर्ण कर्जमाफी दिली पाहिजे.

यानंतर पुढील आंदोलनाची दिशा मान्यवरांनी विशद केली. या प्रसंगी मा. अनिल घनवट, पुणे विभागप्रमुख श्री. अनिल चव्हाण, श्री. अशोक कुलकर्णी (पुणे) यांनी आपल्या भाषणांद्वारे शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाविषयी उपस्थितांना जागृत केले. मेळाव्याचे संयोजक श्री. परमेश्वर तळेकर बोलताना म्हणाले की, संघटनाचे काम करताना साहेबांच्या आशीर्वादाने मेळाव्याची प्रेरणा मिळाली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून स्वखर्चाने मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी आलेल्या सर्व उपस्थितांचे त्यांनी ऋण व्यक्त केले. यापुढेही असेच जागरणाचे कार्य करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी व्यासपीठावर प्रदेश अध्यक्ष श्री. कोले, पुणे विभागप्रमुख श्री. अनिल चव्हाण, सोलापूर जि. अध्यक्ष शिवानंद दरेकर, श्री. अशोक कुलकर्णी (पुणे), श्री. अनिल घनवट, केमचे सरपंच अजित तळेकर, शिवसेना ता. प्रमुख शाहू फरतडे, तालुका अध्यक्ष शिवाजी तळेकर, उपाध्यक्ष लक्ष्मण कदम, माढा तालुका अध्यक्ष मोहन उबाळे, नामदेव भोसले, सर्जेराव बिचीतकर, गोरख तळेकर, पुणे जिल्हाध्यक्ष आबा ताकवणे, ज्येष्ठ नेते वसंतराव आपटे, शिरूर ता. अध्यक्ष शरद गद्रे, युवराज ठोंबरे, महमूद पटेल, पोपट साठे, कार्याध्यक्ष श्री. थिटे मामा आदी उपस्थित होते.

याप्रसंगी सोलापूर जिल्हा युवा आघाडी अध्यक्ष म्हणून श्री. बाळासाहेब जगताप (कुर्डू) यांची तर माढा ता. अध्यक्षपदी मारूती नलवडे (लऊळ) यांची निवड करण्यात आली.

या कार्यक्रमात श्री. ह.भ.प. साबळे महाराज (करंजे, ता. करमाळा) यांनी आपल्या सप्टेंबर ११ ते डिसेंबर ११ या चार महिन्यांचा आदिनाथ कारखान्यातील पगार श्री. परमेश्वर तळेकर यांच्या शुभकार्यास घोषीत केला. त्यांनी यापूर्वी पत्नीसह देहदानाचा संकल्प केला आहे, तसेच महिलांना मोफत साडीवाटप, मंदिर बांधकाम इत्यादी कामांत आपली मदत दिली आहे. याबद्दल त्यांचा सत्कार श्री. कोले यांच्या हस्ते करण्यात आला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केम, वांगी, घोटी, निंभोरे, साडे, वरकुटे, मांजरगाव, उंदरगाव, हिंगणी, पांगरे, शेलगाव, वडशिवणे, कुभेज आदी गावांतील कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. गणेश पवार यांनी तर, आभार डॉ. अंकुश तळेकर यांनी मानले.

# सौ. जयश्रीताई पाटील भारतीय शेतकऱ्यांचे अमेरिकेत प्रतिनिधीत्व करणार



**औरंगाबाद :** शेतकरी संघटनेच्या माजी महिला आघाडी, महाराष्ट्र अध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील यांची बियाणे क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी मोन्सॅन्टो तर्फे, सेंट लुईस, मिसोरी अमेरिका येथे दि. ३ ते ७ ऑक्टोबर २०११ रोजी होणाऱ्या शेतकरी परिसंवादासाठी भारतीय शेतकरी महिला म्हणून निवड झाली आहे. या परिसंवादासाठी वेगवेगळ्या देशांतील प्रतिनिधी भाग घेणार आहेत.

दि. ३ रोजी होणाऱ्या शेतकरी परिसंवादात त्या भारतीय शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून परिसंवदास संबोधित करणार आहेत. त्यानंतर तेथील वेगवेगळा पीक पाहणी दौरा करणार आहेत. भारतातून जाणाऱ्या त्या एकमेव महिला शेतकरी प्रतिनधी असल्यामुळे त्यांच्या निवडीबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे. औरंगाबाद येथील कैलास तवार, पुरुषोत्तम लाहोटी, डॉ. मानवेंद्र काचोळे, ॲड. रामराव नाटकर, ॲड. सा. मा. पंडित, सौ. ऊर्मिला तवार, मंगला देशमुख, सौ. माधुरी शिंदे, सौ. दिपाली पाटील, ज्ञानेश्वर शेलार, रमेश शिंदे, श्रीकांत उमरीकर, ॲड. रघुवीरसिंह पाटील, जी. पी. कदम, दत्तात्रय काकडे, ॲड. परेश पाटील, प्रफुल्ल पाटील, शेख रशीद, हरीष राजपूत, सौ. गीता खांडेभराड, श्रीकांत झाडे यांनी अभिनंदन केले आहे.



**किसानोंके मसीहा शरद जोशीजी के दिर्घायुष्य एवम् स्वास्थ्य हेतु एकादश लक्ष**

**महामृत्यूंजय जप तथा १२ ज्योतीर्लिंग महाभिषेक**

समारोप स्थान : श्री काशिविश्वनाथ ज्योर्तिलिंग (वाराणसी) * ता. १२/१२/२०१२

* आयोजक *



श्री.श्री.श्री. १००८ महंत जीवनदासजी महाराज

**नया पंचायती उदसीन अखाडा, पंजाब**



श्री.श्री.श्री. १००८ महंत पद्मनाभानंदजी गीरी

**तूळजाभवानी संस्थान, राजगादी, राजाटाकळी महाराष्ट्र**



श्री.श्री.श्री. १००८ महंत जगदीश चैतन्यजी

**गंगोत्री, (हिमालय) देवभूमी**

**की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने**
**लब्ध प्रकाश इतिहास निसर्ग माने**
**जे दिव्य दाहक म्हणूनी असावयाचे**
**बुध्याची वाण धरीले करी हे सतीचे**



किसानोंके मसीहा

**मा.शरद जोशी**

स्वा.वीर सावरकरांच्या कवीतेच्या ओळी प्रत्यक्ष जीवनात उतरवणाऱ्या शरद जोशी यांना कोटी कोटी अभिवादन !

शेतकऱ्यांचे लाचारीचे जीणे संपवून त्यांना देशातील ईतर नागरीकाप्रमाणे सन्मानाने, सुखाने व मर्जीप्रमाणे जगण्याचे स्वातंत्र्य मीळावे या करता ***वैभवशाली ऐश्वर्य संपन्न सुखी संसारावर तुळशीपत्र ठेवून आयुष्याचा होम पेटवून*** स्वतःची पर्वा न करता गेली ४० वर्ष देशभर वण वण फिरणाऱ्या शरद जोशींना दिर्घायुष्य लाभण्यासाठी देशातील साधू सन्याशी महंतांनी महामृत्यूंजय जप यज्ञ आरंभिला आहे. या महान धर्मकार्यात यथाशक्ती सहकार्य करून पूण्यकर्मात वाटेकरी व्हावे हि विनंती.

संयोजक : सुधीर बिंदू



पुरुषोत्तम लाहोटी

संपर्क मंत्री

मो.09860203062

# शेतकरी संघटनेच्या वतीने विभागीय कापूस आणि ऊस परिषदेचा कार्यक्रम




**पुणे :** दि. ३० सप्टेंबर रोजी शेतकरी संघटनेच्या वतीने कृषी आयुक्तालय, पुणे येथे मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी झालेल्या जाहीर सभेत ॲड. वामनराव चटप यांनी विभागीय कापूस व ऊस परिषदेची घोषणा केली. या कार्यक्रमांचे ठिकाण व तारखांची माहिती सोबत देण्यात आली आहे. विभागीय कापूस परिषदांच्या यशस्वीतेसाठी विभागवार दौऱ्यांचे आयोजन करण्यात आले आहे.

त्याचबरोबर दि. २३ ऑक्टोबर २०११ रोजी करमाळा जि. सोलापूर येथे मा. खा. शरद जोशी यांच्या उपस्थितीत भव्य ऊस परिषद घेण्याचे ठरले आहे. त्या तयारीसाठी पश्चिम महाराष्ट्र दौरा पुढीलप्रमाणे नियोजित केला आहे.

## ऊस परिषदेसाठी विभागीय दौरा वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| दि. ११ ऑक्टो. | नगर | मा. संजय कोले, मा. अनिल घनवट |
| दि. १२ ऑक्टो. | पुणे | मा. अनिल चव्हाण, मा. उज्ज्वला नरदे |
| दि. १३ ऑक्टो. | सोलापूर | मा. परमेश्वर तळेकर |
| दि. १४ ऑक्टो. | सांगली | शिवानंद दरेकर |
| दि. १५ ऑक्टो. | कोल्हापूर | ज्ञानेश्वर अप्पा सकुंडे |
| दि. १६ ऑक्टो. | सातारा | आप्पासाो ताकवणे |

## ऊस परिषद

करमाळा, जि. सोलापूर येथे
दि. २३ ऑक्टोबर रोजी
मा. शरद जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत

## कापूस परिषदेसाठी विभागीय दौरा वेळापत्रक

### मराठवाडा

| | | |
|---|---|---|
| दि. ११ ऑक्टो. | औ.बाद | मा. गोविंदभाऊ |
| दि. १२ ऑक्टो. | जालना | मा. गुणू पाटील |
| दि. १३ ऑक्टो. | परभणी | मा. कैलास तवार |
| दि. १४ ऑक्टो. | माजलगाव | मा. जयश्रीताई पाटील |
| दि. १५ ऑक्टो. | लातूर/उस्मानाबाद | मा. सुधीर बिंदु |
| दि. १६ ऑक्टो. | नांदेड | मा. अंजली पातूरकर |
| दि. १७ ऑक्टो. | हिंगोली | मा. डॉ. कदम |

### पूर्व विदर्भ

| | | |
|---|---|---|
| दि. ११ ऑक्टो. | वर्धा | मा. वामनराव चटप |
| दि. १२ ऑक्टो. | नागपूर | मा. शैलाताई देशपांडे |
| दि. १३ ऑक्टो. | गडचिरोली | मा. मधु हरणे |
| दि. १४ ऑक्टो. | चंद्रपूर | मा. अरुण केदारे |

### पश्चिम विदर्भ

| | | |
|---|---|---|
| दि. ११ ऑक्टो. | अमरावती | मा. सरोजताई काशीकर |
| दि. १२ ऑक्टो. | अकोला | मा. जगदीश नाना बोंडे |
| दि. १३ ऑक्टो. | बुलडाणा | मा. सम्राट डोंगरदिवे |
| दि. १४ ऑक्टो. | वाशीम | मा. मायाताई पाटील |
| दि. १५ ऑक्टो. | यवतमाळ | मा. वामनराव जाधव |

## विभागीय कापूस परिषद

१) अमरावती येथे दि. १ नोव्हेंबर २०११
२) धुळे येथे दि. ३ नोव्हेंबर २०११
३) परभणी येथे दि. ५ नोव्हेंबर २०११
४) वर्धा येथे दि. ७ नोव्हेंबर २०११

# बुलडाण्यात शेकडो कार्यकर्त्यांचा शेतकरी संघटनेत प्रवेश



**बुलडाणा :** मा. श्री. शरद जोशी साहेब यांच्या विचारांनी प्रभावित होऊन घाटाखालील शेकडो कार्यकर्त्यांनी दि. १४ सप्टेंबर रोजी बचत भवन, बुलडाणा येथे वामनराव जाधव, उपाध्यक्ष स्वतंत्र भारत पक्ष, महाराष्ट्र यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात जाहीर प्रवेशाची घोषणा केली.

प्रवेशावर विचार प्रगट करताना श्री. राजेश सुरळकर यांनी शेगाव येथे १० नोव्हेंबर २०१० रोजी झालेला शेतकरी संघटनेचा भव्य मेळावा व अभूतपूर्व रेल रोको या घटनेपासून मी व माझे सहकारी शेतकरी संघटनेकडे आकृष्ट होत गेलो, त्यात नवीन जिल्हाध्यक्ष देविदास कणखर व दामोधर शर्मा यांची जोशी साहेबांच्या विचाराने अभ्यासपूर्ण आंदोलने तसेच त्यांत शेतकऱ्यांप्रति असलेला जिव्हाळा, संघटनेच्या प्रत्येक कार्यकर्त्याची काम करण्याची अभ्यासपूर्ण पद्धत व त्यांचा चळवळीतील ३० वर्षांचा त्याग याचा व इतर राजकीय पक्ष व विविध संघटना यांच अभ्यास केला असता शेतकरी संघटनाच शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवू शकते. हे पाहून आम्ही विविध पक्षांतील कार्यकर्त्यांनी शेतकरी संघटनेत प्रवेशाचा निर्णय घेतला, असे मत व्यक्त केले.

या कार्यकर्त्यांचा डॉ. हसनराव देशमुख, नामदेवराव जाधव, देविदास कणखर, रमेशसिंग चव्हाण, दामोधर शर्मा, डॉ. विनायक वाघ, सादिकभाई यांच्या हस्ते संघटनेचे बिल्ले लावून संघटनेत स्वागत करण्यात आले. यामध्ये राजेश सुरळकर, सय्यद मोबीन सय्यद बनु, सुभाष सोनुने, पुंजाजी इंगळे, अनंता ढोले, आबीकखाँ इनुसखाँ, तुळशीराम तारोळे, जेटुशेठ राठी, मधुकर बावस्कार, प्रल्हाद मारखळे, श्रीराम ढोले, महादेव काळे यांच्यासह २०० कार्यकर्त्यांनी शेतकरी संघटनेत जाहीर प्रवेश केल्याची घोषणा देविदास कणखर यांनी केली.

---

## शेतकरी संघटक स्थिर निधी

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

*कै. सखुबाई नानाजी वडसकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ*

**श्री. आनंद वडसकर** रु. १५००

**सौ. कमलताई वडसकर** रु. १५००

*चंद्रपूर जिल्हा महिला आघाडी प्रमुख*

| | |
|---|---|
| यापूर्वी जमा निधी | रु. ६३,२०० |
| स्थिर निधी एकूण रक्कम = | रु. ६६,२०० |

सर्व देणगीदारांचे

**मनःपूर्वक आभार.**

स्थिर निधीसाठी जास्तीत जास्त साहाय्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**- कार्यकारी संपादक**